म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय
दा. क्र. 3008

संस्कार कथामाला ४

# अमर बलिदान



BVBK-0403004

डॉ. कृ. पं. देशपांडे

3008 बा.वा.
१०।८।८४

म. ई. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. 3008 दिनांक १०।८।८४
विषय बा. वा. क्र. . . . . . . .

3004

# संस्कार कथामाला भाग - ४

## अमर बलिदान

डॉ. कृ. पं. देशपांडे

मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११०३०

BVBK-0403004

# अमर बलिदान (संस्कार कथामाला भाग - ४)

प्रकाशिका : सौ. मधुमिता राजीव बर्वे
मधुराज पब्लिकेशन्स् प्रा.लि.
२५१ क शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

© डॉ.कृ.पं.देशपांडे
'सुरभि' १३५/१२ ब प्रभा सोसायटी
भवानी मंदिराजवळ, पौड रस्ता
कोथरुड पुणे ४११ ०२९

प्रकाशन दिनांक : १४ जानेवारी १९९४ (मकर संक्रांत)

प्रकाशन क्रमांक : ६४२

ISBN : 81-85773-64-5

मुद्रक : श्री. प्रमोद बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ पुणे ४११ ०३०

टाइपसेटींग : यशोदिप टाईपसेटींग
५९० शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ : श्री. अनिल उपळेकर

मूल्य : रूपये वीस मात्र

– संस्कारक्षम वयात
ज्यांनी मला
सुसंस्कारित केले
त्या माझ्या
सर्व गुरुजनांना....

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १) | भक्तीचा पाहुणा | ५ |
| २) | स्वाभिमानी नरेंन्द्र | २३ |
| ३) | एक नवी सुरवात | २७ |
| ४) | अमर बलिदान | ४० |
| ५) | दिन कृतार्थतेचा | ६० |

# भक्तीचा पाहुणा

"मग युवराजांना आवडतं तरी काय? कळू दे त्यांची आवड आम्हाला!" हिरण्यकश्यपूने प्रेमाने विचारले. त्याला शांत मनाने आणि स्निग्ध स्वराने उत्तर देत प्रल्हाद म्हणाला,

"तात, मला ध्यानं करायला आवडतं. चिंतन करायला आवडतं !"

"असं ! कोणाचं ध्यान, चिंतन करायला आवडतं?"

"विष्णूचं... !"

"काय... !विष्णूचं ध्यान... माझ्या शत्रूचं ध्यान... ?"

विष्णूचे नाव काढताच तो मनातून घाबरला आणि संतापलाही! आपल्या हाडवैऱ्याचे नाव आपल्या मुलाने घ्यावे अन् तेही आनंदाच्या क्षणी! त्यामुळे त्याच्या रंगाचा भंग झाला. खरं म्हणजे तो आज विशेष आनंदात होता. आज त्याच्या लाडक्या प्रल्हादाचा वाढदिवस होता. प्रल्हाद एक गोड मुलगा होता. हिरण्यकश्यपू कठोर वृत्तीचा, निर्दय; पण तोसुद्धा प्रल्हादाच्या हसण्याने विरघळून जाई. प्रल्हादाच्या मधाळ बोलण्याने त्याच्या चेहऱ्यावर स्मित-रेषा उभी राहत असे. त्याच्याशी गप्पा मारण्यात तो रमून जात असे. त्याचा सहवास पारिजातकाच्या रम्य, धुंद सुवासासारखा त्याला वाटत असे. वज्रासारखा कठोर असणारा हिरण्यकश्यपू, पण प्रल्हाद जवळ असला की फुलासारखा मृदू बनत असे; आणि आज तर त्याचा वाढदिवस. मग आनंदाला मर्यादा कशी असणार?

आपल्या महालात तो उच्चासनावर बसला होता. राजगुरू शुक्राचार्यांचे पुत्र शंड आणि अमर्क यांच्याबरोबर त्याचे बोलणे चालू होते. एवढ्यात महालाचा पडदा हलल्याने त्याचे लक्ष

३००४ १०।८।८४
बा. वा.

तिकडे गेले. महाराणी कयाधू आपल्या सहा वर्षांच्या प्रल्हादाला घेऊन प्रवेश करीत होती. नुकत्याच घातलेल्या स्नानाने प्रल्हादाचे अंग विशेष तुकतुकीत, सतेज दिसत होते. भरजरी वस्त्रे आणि रत्नजडित भूषणांनी आधीच्या गौरकांतीला विशेष शोभा आली होती. खरं म्हणजे प्रल्हादाच्या सुरेख अंगकांतीला दागिने शोभून दिसत होते का दागिन्यांमुळे प्रल्हाद शोभून दिसत होता हे सांगणेच कठीण होते.

वडिलांना पाहताच प्रल्हाद धावतच पुढे झेपावला. दैत्यराजाने आपले बाहू पसरले आणि त्या अजस्त्र मिठीत बाळ प्रल्हाद सामावून गेला, एका मोठ्या शिंपल्यात मोती सामावून जावा तसा! थोड्या वेळाने हिरण्यकश्यपूने त्याला कुरवाळिले. प्रेमभराने त्याचे चुंबन घेतले. आपल्या मांडीवर बसविले. कयाधूही जवळ बसली होती. पितापुत्रांच्या या प्रेमाने ती न्हाऊन निघाली होती. मनातील तृप्तता डोळ्यांत उतरली होती. भावनावेग कमी होताच प्रल्हादाच्या पाठीवरून हात फिरवून हिरण्यकश्यपू म्हाणाला,

"बाळ, तुझं कल्याण असो. आज आपल्या दैत्यकुळाला शोभेल असा थाट केलास. छान!"

"तात, खरं म्हणजे मला हे काहीच नको होतं; पण आईनंच सारं करायला लावलं,"

"वा, म्हणजे हे सारं आईकरता केलं होय? युवराज, हे सगळं तुम्हांला करायलाच पाहिजे. आपण राजे आहोत. राजवाड्यातील साऱ्या वस्तू, ही वस्त्र, अलंकार, नोकर, चाकर हे सारं आपल्या उपभोगाकरिताच आहे."

"पण तात, मला याची खरंच आवड नाही. या साऱ्यांचा उपभोग घ्यावा असं वाटतच नाही." --

प्रल्हादाची भौतिक सुखाची नावड पाहून, त्याची निरिच्छ वृत्ती पाहून हिरण्यकश्यपूला आश्चर्य वाटले. 'वास्तविक दैत्यकुळात जन्माला आलेला कोणीही सर्व भौतिकसुखे आपल्यालाच मिळाली पाहिजेत या भावनेने जगाचा स्वामी होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतो आणि प्रल्हादाला याची आवड वाटत नाही म्हणजे आश्चर्यच आहे.' त्यामुळेच त्याने आश्चर्यमिश्रित कौतुकाने विचारले-

'मग युवराजांना आवडतं तरी काय? कळू दे त्यांची आवड आम्हाला?'

प्रल्हादाने विष्णूचे नाव घेताच मात्र तो मनातून चरकला. त्याला एक जबरदस्त धक्का बसला. "विष्णू..." ही दोनच अक्षरे, तरीही या दोन अक्षरांच्या उच्चाराने त्याच्या तळपायाची आग मस्तकाला जात होती. "देवांचा कैवारी अन् आणि आपला कट्टर वैरी! हिरण्याक्षाचा वध त्यानंच वराहाचं रूप घेऊन केला. आणि आता...? त्या वधाचा सूड मला घेतलाच पाहिजे. हिरण्याक्षाला त्यांनं फसवून मारलं, म्हणून त्याच्या काव्याला मी फसणार नाही. माझ्याशी युद्ध करायला सामर्थ्य पाहिजे. मी त्याला थोडाच घाबरणार?" विचारांच्या हिंदोळ्यावर तरंगत असताना मनात कोठेतरी एक शंका-तरंग उमटला - "तू विष्णूला घाबरत नव्हतास ना? मग तपश्चर्या कशाला केलीस? शस्त्राने, अस्त्राने, दिवसा किंवा रात्री, माणसाकडून वा प्राण्याकडून कोणाकडूनही मृत्यू येणार नाही असा वर कशाला मिळविलास?" दैत्यराज थोडासा बावरला. मग त्याने मनाचे समाधान केले. "हो, पूर्वी तसं असेल कदाचित; पण आता हा वर मिळाल्यामुळे मला कोणाचेच भय बाळगण्याचे काहीच कारण नाही. अन् त्यातून प्रल्हादाला कशाला घाबरायचे? तो माझा मुलगा आहे. लहान आहे. आज ना उद्या माझे

म्हणणे त्याला पटेल. त्याच्या रूपाने जर माझा घात करायचा कोणाचा प्रयत्न असेल तर ते मात्र शक्य होणार नाही.''

हिरण्यकश्यपूने प्रल्हादाच्या चेहऱ्याकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर तीच सात्त्विकता, तीच निरागसता दिसत होती. तो स्वस्थ झाला. प्रल्हादाला योग्य शिक्षण देणं हाच यावर एक उपाय आहे असे वाटून तो शंडामर्कांना म्हणाला,

''गुरुपुत्रांनो, आत्ताचे प्रल्हादाचे बोल तुम्ही ऐकलेत. तो अजून लहान आहे. त्याला आपलं कुल, आपला आचार, आपलं कर्तव्य यांचं ज्ञान नाही; तेव्हा तुम्ही याला तुमच्या आश्रमात घेऊन जा, आणि दैत्यकुलाला शोभेलसं शिक्षण द्या. तुम्हीच याला तयार करा.''

गुरुपुत्रांनी राजाची आज्ञा प्रमाण मानली. प्रल्हादाची गुरुगृही जाण्याची तयारी सुरू झाली. कयाधूला मात्र वाईट वाटले. तिला हे पटेना. प्रल्हादावर तिचे खूप प्रेम होते. चारीही मुलांत तो जास्त लाडका होता. त्याचा वियोग होणार या कल्पनेने ती वेडीपिशी झाली. ती राजाला म्हणाली,

''महाराज, अजून त्याचं पोरवय. आताच त्याला पाठवू नये. चुकून तो काही बोलला असेल. क्षमा करावी त्याला. रागवू नये त्याच्यावर.''

''महाराणी ! विषवेल वेळीच ओळखता आली नाही, वेळीच तिचा बंदोबस्त केला नाही तर नंतर उपयोग नसतो. विषारी साप लहान म्हणून त्याला सोडता येत नाही; आणि अग्नीचा स्फुल्लिंग बारीक म्हणून त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही.''

''महाराज, काय बोलता आहात हे. आपला मुलगा ना तो !''

"हं, माहीत आहे मला. या बाबतीत मला तुमचा सल्ला नको आहे. मी एकदा ठरवलं म्हणजे त्यात बदल होत नसतो, हे माहीत आहे ना तुम्हाला?"

"होय महाराज, तरीही..."

"आपल्या दुबळ्या अश्रूंचा माझ्यावर काहीही परिणाम होणार नाही. प्रल्हाद गुरुगृही जाणार. आपण येथून जावं. जास्त बोलायला लावू नका."

बिचारी कयाधू खालच्या मानेने आणि अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी महालात आली. प्रल्हाद निरोप घ्यायला आला तेव्हा ती तशीच खिन्नपणे बसली होती. त्याने तिला नमस्कार केला.

"आई, मी गुरुगृही विद्याभ्यासाला जातो आहे. मला आशीर्वाद दे ना! आईच्या आशीर्वादाशिवाय यशप्राप्ती होत नसते."

"बाळा, तुला तेथे का पाठवीत आहेत ते तुला माहीत नाही रे!"

"आई, गुरुगृही विध्याभ्यास करणं हे माझं ध्येय राहील. मी लक्षपूर्वक सारं ऐकेन, आणि आई, विद्याप्राप्तीकरिता कितीही संकटं आली ना तरी मी ती धैर्यानं सहन करीन. तू अगदी निश्चिंत रहा."

"बाळा..."

कयाधू काही सांगणार तोच हिरण्यकश्यपू आत आला. तिचे शब्द तोंडातच विरून गेले. प्रल्हाद न बोलता गुरुगृहाची वाट चालू लागला. आपल्या लाडक्या प्रल्हादाच्या मूर्तीकडे ती अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी पहात होती.

गुरुगृहाची सवय होईपर्यंत प्रल्हाद थोडासा बुजला. थोडा

बावरला;पण थोड्याच दिवसांत तो तेथे रुळला. तेथे त्याला नवीन मित्र मिळाले आणि तो पूर्वीप्रमाणेच आनंदी दिसू लागला. आनंद त्याच्या हृदयात भरला होता. मन आनंदी असले की सारे जगच आनंदी दिसते.

तेथे त्याचा विद्याभ्यास सुरू झाला. तो एकाग्रपणे सारे ऐकत असे. त्याची बुद्धी कुशाग्र होती. एकाग्रपणे अध्ययन करणं ही यशाची पहिली पायरी आहे.



हे त्याला माहीत होते. त्याच्या सारे लक्षात राहत होते. विद्याभ्यास झाल्यानंतर मात्र जेव्हा वेळ मिळेल तेव्हा त्याचे विष्णूचे नामस्मरण सुरू असे. तो त्यात तल्लीन होत असे. त्याच्या गुरुजींच्या लक्षात हे यायला फारसा उशीर लागला नाही. राजाने सोपविलेल्या कामगिरीत हा विष्णू विघ्न आणणार हे त्यांना कळले. आता याला जर वेळीच जरब बसविली नाही तर पोरगं बिघडेल आणि प्रायश्चित्त मात्र आपल्याला मिळेल, अशी त्यांच्या मनाची खात्री झाली.

एके दिवशी त्यांनी प्रल्हादाला बोलावले आणि मृदू शब्दांत विचारले,

"बाळा, तू दैत्यपुत्र आहेस ना?"

"होय...मग..."

"मग तुझे आचार-विचार दैत्य कुळाला शोभेसे पाहिजेत. तुझा कोणी बुद्धिभेद करतो का?"

"नाही...का... ?"

"मग तुझ्या मनात विष्णूबद्दलचे विचार कसे येतात? हे विचार येणे योग्य नाही. तू विष्णूबद्दल विचार का करतोस? सांग ना.आम्हाला."

"गुरुजी, विष्णूबद्दल विंचार कर असं कोणी सांगायला का लागतं? ते नैसर्गिक आहे. आकाशात पौर्णिमेचा चंद्र प्रकाशमान झाला की, तू उचंबळून ये असं सागराला कोणी सांगतं का? सूर्यफुलाला सूर्याकडे बघ असं कोणी शिकवतं का? आपल्या आईवर प्रेम कर असे कोणी सांगायला का लागतं? ते नैसर्गिक असतं ना, तसंच विष्णूबद्दलचं माझं आकर्षणही नैसर्गिक आहे."

प्रल्हादाने शांतपणे उत्तर दिले. त्याची शांतता पाहून शंडामर्क मात्र रागाने लाल झाले; आणि ओरडून म्हणाले -"कार्ट्या, लाज नाही वाटत विष्णूचं नाव घ्यायला? तुझ्या वडिलांचा तो शत्रू अन् त्याचं नाव घेतोस?"

"कोण...विष्णू शत्रू? कसं शक्य आहे? जगन्नियंत्याशी कधी तरी वैर करता येईल का? तो तर साऱ्या वस्तुमात्रात भरून राहिला आहे. त्याच्याशी कोणीच वैर करू नये."

कुलांगारा कार्ट्या, तू आम्हांला ब्रम्हज्ञान शिकवतोस? ती छडी आण रे इकडे..."

त्यांनी हातात छडी घेतली प्रल्हादाच्या हातापायांवर, पाठीवर त्या छडीचे प्रहार होऊ लागले. तो शांतपणे मार सहन करीत होता. आपल्या मनाला योग्य वाटणारे सत्कृत्य करीत असताना शारीरिक वा मानसिक संकटे कितीही आली तरी त्यांना धैर्याने तोंड दिल्याशिवाय इच्छित फल प्राप्त होत नाही.

प्रल्हाद तिळभरही हलला नाही. विष्णूचे ध्यान करीत तो त्या रूपाशी तल्लीन झाला होता. बऱ्याच वेळाने गुरुजींचे हात दुखू लागले. त्यांनी मारणे थांबविले. त्यांनी आपला हात आवरला.

या प्रसंगाने प्रल्हाद भगवंताकडे अधिकच आकर्षिला गेला. संकटकालीच मन देवाकडे अधिक ओढले जाते. त्याची अधिक भक्ती करायला लागते.

प्रल्हादाचे अध्ययनही चालू राहिले; आणि राहिलेल्या वेळात परमेश्वर भक्तीही!

बरेच दिवसांत प्रल्हाद घरी गेला नव्हता. तरीही त्याला घरची ओढ लागलेली दिसली नाही. आत्मानंदात राहणाऱ्या लोकांना घर आणि दार, राजप्रसाद आणि आश्रम दोन्ही सारखेच असतात.

तथापि महाराजांना त्यांच्या अध्ययनाचे वृत्त बरेच दिवसांत न समजल्याने गुरुजींनी प्रल्हादाला बरोबर घेतले आणि ते एके दिवशी राजवाड्यात पोहोचले.

हिरण्यकश्यपू आपल्या महालात बसला होता. जवळच प्रल्हादाची आईही होती. आपल्या लाडक्या पुत्राला पाहताच तिच्या नेत्रांतून आनंदाश्रू पाझरू लागले. इतकेच नव्हे तर राजालाही आनंद झाला. प्रल्हादाने खाली वाकून दोघांनाही

नमस्कार केला. त्यांनी आशीर्वाद दिला. गुरुपुत्रांना बसायला आसने दिली. हा सोहळा पाहून गुरुपुत्र म्हणाले,

"महाराज, बाळ प्रल्हाद अत्यंत कुशाग्र बुद्धीचा आहे. आम्ही शिकवलेलं सारं ज्ञान त्यानं ताबडतोब मुखोद्गत केलं आहे. त्याची आपण परीक्षा घ्यावी."

"परीक्षा घ्यावी" हे ऐकताच कयाधूच्या मनात धस्स झाले आणि पुत्राच्या प्रशंसेने राजाला धन्य झाल्यासारखे वाटले. हिरण्यकश्यपूने प्रल्हादाच्या चेहऱ्याकडे पाहिले; त्याला वाटले प्रल्हादही आनंदला असेल; पण तिथे होती स्निग्ध शांतता, आणि दिव्य तेज! तो पुन्हा एकदा चपापला. स्वतःला सावरत त्याने प्रल्हादाला विचारले,

"बाळ गुरुजी सांगतात, तू साऱ्या शास्त्रांचं अध्ययन केलं आहेस, तेव्हा त्यात तुला काय आवडलं ते तर सांगशील?"

"तात, खरं म्हणजे ही शास्त्रं मला फोल वाटतात."

"ती का बरं?"

"कारण उघड आहे. ही सारी शास्त्रं भेदबुद्धी शिकवतात."

"मग?..."

"तात, भेदबुद्धी तर साऱ्या दुःखांचं मूळ आहे. तेव्हा अशा भेदबुद्धी निर्माण करणाऱ्या शास्त्रात चांगलं काय असणार, तुम्हीच सांगा. तात, माझ्या दृष्टीनं ही सारी शास्त्रं फोल आहेत. निरर्थक आहेत. यानं अनर्थ निर्माण होतील."

"काय...चांडाळा...कोणी शिकवलं हे असलं?"

हिरण्यकश्यपू क्रोधाने थरथर कापू लागला. त्याने प्रल्हादाला मांडीवरून ढकलून दिले. त्याचे खदिरांगारासारखे लाल डोळे शंडामर्क गुरुपुत्रांकडे वळले. त्याने कडाडून गर्जना केली.

"नीचांनो! माझ्या मुलाला तुम्ही हे काय शिकविलंत?

मी याला तुमच्याकडे कशासाठो दिला होता हे तुम्हाला माहीत नाही ? हे काय केलंत...?"

"महाराज. .महाराज, यात आमचा काही दोष..."

"काही बोलू नका. तुमच्यावर विश्वास टाकला हेच चुकलं. तुम्ही माझा घात केलात. शत्रुपक्षाला तुम्ही सामील असला पाहिजे."

"महाराज. यातलं काही एक खरं नाही."

"मग हे असं झालंच कसं?"

"महाराज, तुमचा मुलगा खरंच हुषार आहे. ही सारी त्याचीच अक्कल आहे. आम्ही यातलं काहीएक शिकवलं नाही."

"ही त्याची अक्कल आहे. एवढ्या लहान वयात ही अक्कल येणं कसं शक्य आहे?"

सारा प्रकार पाहून कयाधू घाबरून गेली. असहाय्य स्थितीत ती तेथे उभी होती. काय घडत आहे आणि काय घडणार आहे, हे तिला कळतच नव्हते. तोच हिरण्यकश्यपूने प्रल्हादाला लाथेने डिवचले आणि विचारले,

"कार्ट्या, ही अक्कल तुला कोणी शिकवली? या गुरुपुत्रांनी?"

"नाही..." प्रल्हादाने शांतपणे उत्तर दिले.

"मग कुणी? बोल...?"

"तात, हे शिकवायला कशाला पाहिजे? याची प्रचीती येते, अनुभव येतो."

"प्रचीती येते काय? तुला आली?"

"होय."

"कशी?"

"तात, या सर्व चराचर पृथ्वीमध्ये विष्णू भरून राहिला आहे या निष्ठेने, या भावनेने सगळीकडे पाहिलं की ही प्रचीती येते. मग ही सारी शास्त्रं मिथ्या वाटायला लागतात."

पुन्हा विष्णूचे नाव ऐकताच हिरण्यकश्यपूचा संताप अनावर झाला, त्याला त्याने लाथेनेच ठोकरले. तो कडाडला,

"कोण आहे रे तिकडे... पाहता काय, या कारट्याला येथून फरफटत न्या. हा माझा शत्रू आहे."

सारे पाहून कयाधू ओरडली,

"नाथ,...काय म्हणता आहात? आपला पुत्र...!"

"चूप...हा माझा शत्रू आहे."

पहारेकऱ्यांकडे पाहून तो पुन्हा ओरडला.

"पाहता काय...उचला याला. दूर न्या आणि माझ्या देखत ठार करा. हा जिवंत राहता कामा नये."

"महाराज...महाराज...दया करा निदान थोडे दिवस तरी..." कयाधू दु:खाने म्हणाली.

"महाराणी, तुमचं ऐकलं तर हा माझाच मुलगा माझा प्राण कधी घेईल, त्याचा नेम सांगता यायचा नाही."

"काय म्हणता आहात हे आपण?"

"खरं तेच सांगतो, शरीराचा एखादा अवयव, रोगामुळे शरीराची नासाडी करू लागला तर तो अवयव कापून काढावा लागतो. नाहीतर सारं शरीर वाया जातं. याला ठार केलाच पाहिजे. मारा...मारा याला."

काय करावे ते सेवकांना सुचेना. राजाचा हुकूम पाळणे आवश्यक होते. कयाधूला ते बघवेना. तिने केलेल्या विनवण्यांचा काही उपयोग झाला नाही. सेवक त्या निष्पाप बालकाला

मारू लागले. तलवारीच्या टोकांनी टोचू लागले. प्रल्हाद शांत होता. मुखाने भगवंताचे नामस्मरण चालले होते. धैर्यवान माणसे अत्यंत आणीबाणीच्या काळातही आपली मन:शांती सोडीत नाहीत; आणि अंगीकृत कार्यही थांबवीत नाहीत.

सेवक थकले. प्रल्हाद मारला गेला नाही. हे पाहून हिरण्यकश्यपू मात्र मनातून घाबरला. ही लक्षणे ठीक नाहीत, हे त्याने मनातून जाणले. एवढा मोठा सम्राट; पण या काळजीने झुरणीला लागला.

काळजी हा एक भयंकर रोग आहे. ज्याला तो लागेल त्याचे शरीर आणि मन दोन्हीही पोखरले जाते.

हिरण्यकश्यपूने मनाशी निश्चय केला. कोणत्याही परिस्थितीत या पोराचा बंदोबस्त केलाच पाहिजे.

प्रल्हादाला त्याने एका खोलीत ठेवले. बाहेर रक्षक उभे केले. प्रल्हाद काय काय करतो, यावर त्यांना लक्ष ठेवायला सांगितले.

आपल्या वडिलांची बदललेली वागणूक प्रल्हादाच्या लक्षात आली. आता आपल्यावर नाना संकटे कोसळतील, याचीही कल्पना आली. तरीही तो जाणून होता की, हा भवसिंधू पार करण्यासाठी भगवंताचे भक्तिभावाने नामस्मरण करणे हाच एक उपाय आहे. त्यानेच मन:शांती मिळेल.

नामस्मरणाच्या आपल्या हट्टापासून प्रल्हाद ढळला नाही; कारण जीवनाचे रहस्य त्याला समजले होते. देह नाहीसा झाला तरी आत्मा अविनाशी आहे. हा आत्मा किंवा आत्मतत्त्व जे आपल्या अस्तित्वाच्या मुळाशी आहे, तेच आत्मतत्त्व चराचर पृथ्वीवर भरून राहिले आहे. ते आत्मतत्त्व म्हणजेच भगवान विष्णू! सर्व वस्तूंतच भगवान विष्णू भरून राहिला

आहे, ही एकात्मतेची भावना निर्माण झाली की भेदबुद्धी नाहीशी होते. मन शुद्ध होते; आणि या शुद्ध मनाचा आनंद नित्य असतो. हा आनंद एकदा प्राप्त झाला की देहाची तमा रहात नाही.

यामुळेच प्रल्हादला मनाने शांत होता. धैर्याने सर्व सहन करीत होता. रक्षकांनी त्याचा दिनक्रम राजाला कळविला, राजा तर आधीच रागावलेला होता. तसाच तरातरा तो प्रल्हादाकडे आला व म्हणाला,

"कारट्या, तुला कोंडून ठेवले . कालपासून अन्न दिलं नाही तरी तुझं विष्णूचं नाव जात नाही ना?"

प्रल्हाद शांतपणे म्हणाला,

"तात, ते कसं जाईल? दुधात साखर जशी एकरूप होते. तसा विष्णु स्वरूपाशी मी एकरूप झालो आहे. तो आणि मी भिन्न नाहीच."

"मूर्खा, तो आणि तू भिन्न नाही काय? ठीक आहे बघतो तुझा विष्णू तुला कसं वाचवतो ते!"

हिरण्यकश्यपूने सेवकांना आज्ञा केली," या पोरट्याला न्या आणि हत्तीच्या पायी द्या." सेवकांनी राजाज्ञेप्रमाणे त्याला तेथून हलविले. एका मोठ्या मैदानात मदमस्त हत्ती आणविला गेला. सेवक प्रल्हादाला घेउन आले. अनेक वेळा प्रयत्न करूनही हत्ती त्याच्या जवळून गेला पण त्याच्या अंगावर त्याने पाय टाकला नाही. त्यामुळे विष्णूस्वरूपाशी, आत्मतत्त्वाशी एकरूप झालेल्या प्रल्हादाला काही झाले नाही.

ही वार्ता दैत्यराजाच्या कानावर आदळताच त्याने लगेच दुसरा हुकूम सोडला. "याला अग्नीत टाका." अग्निकुंड तयार झाले. लांबूनही त्या अग्नीची दाहकता जाणवत होती. दोन

सेवकांनी त्याला उचलले आणि त्या रसरसत्या अग्निकुंडात फेकले. कालांतराने अग्नी शांत झाला. हात जोडून भगवंताची प्रार्थना करणारा बाळ प्रल्हाद शांत चित्ताने त्या अग्निकुंडात बसलेला होता.

हे ऐकून हिरण्यकश्यपू मात्र मनात चरकला. त्याने आणखी अघोरी उपाययोजना सुरू केली. प्रल्हादाच्या गळ्यात मोठा दगड बांधून त्याला जलाशयात टाकले. दगड काही बुडेना. पुन्हा दुसरी शिक्षा. त्याला उकळत्या तेलात टाकले तरी काहीच परिणाम झाला नाही. एका पर्वताच्या उंच शिखरावर त्याला नेलं. खूप खोल असणाऱ्या दरीत त्याला ढकललं. एवढ्या उंचावरून त्याला खाली टाकले म्हणजे हा निश्चित मरणारच म्हणून साऱ्यांनी निःश्वास टाकले. काही दिवस त्या समाधानात घालवले; पण पहातात तो प्रल्हाद पुन्हा हजर!

शेवटी कंटाळून हिरण्यकश्यपूने विषारी सापांकरवी प्रल्हादाला दंश करवावयाचे ठरवले, सेवक खोटं बोलतील या कल्पनेने तो स्वत: त्या ठिकाणी हजर राहिला. एका फ्रेनात विषारी साप आणले आणि त्यांना प्रल्हादाच्या अंगावर सोडले. प्रल्हाद नामस्मरणात रंगून गेला होता. साप अंगावर येत आहेत हे पाहताच त्याने त्यांच्या अंगावरून हात फिरवला आणि आश्चर्य असे की, प्रल्हादाप्रमाणे ते सापही डोलायला लागले. ते प्रल्हादाला चावेनात. ज्यांनी साप आणले होते, त्यांनी सापाला डिवचले. प्रल्हादला दंश व्हावा म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केला; पण डिवचलेल्या सर्पांनी त्यांनाच दंश केला. त्या सापांचे विष इतके भयंकर होते की साप चावलेली माणसे तडकाफडकी मेली. ते पाहताच हिरण्यकश्यपूने हा नाद सोडून दिला. हताश होऊन तो महालात येऊन बसला.

एकच प्रश्न वारंवार त्याच्या मनात येत होता, त्याला सतावीत होता. "इतके अघोरी उपायही हा पोरगा धैर्याने सहन करतो; पण आपला हट्ट सोडीत नाही हे कसे? काय करावे? विचार करून-करून मस्तक फुटायची वेळ आली, तरी त्याचे उत्तर मात्र त्याला सापडत नव्हते. तो अगदी बेचैन झाला. अस्वस्थ झाला. दोन-चार दिवस रात्रंदिवस तळमळत राहिला. रात्री झोपही येईना. झोपायचा प्रयत्न केला की त्याला हात जोडून विष्णूचे नामस्मरण करणारा प्रल्हाद आणि त्या पाठीमागे उभा असणारा विष्णू दिसायला लागला. आधी झोप येत नसे आणि जरा कोठे डोळा लागला की अशा स्वरूपाचे स्वप्न पडून तो खडबडून जागा होत असे. "काय करावे...?" हा एकच निरुत्तर करणारा प्रश्न त्याला भेडसावीत होता.

आणि एके दिवशी-सायंकाळचा सुमार. आकाश ढगांनी भरून आलं होतं. मेघगर्जना चालू होत्या. सोसाट्याचा वारा वाहत होता. विजांचा कडकडाट चालू होता. निसर्गाने रौद्ररूप धारण केलं होतं. हिरण्यकश्यपू आपल्या विचारात मग्न होता. एकाएकी तो उठला. तो क्रोधाने लाल झाला होता. सेवकाला त्याने हाक मारली आणि सांगितले,

"जा त्या प्रल्हादाला माझ्यासमोर उभा करा."

प्रल्हादाला तेथे आणण्यात आले. त्याने आपल्या पित्याला वंदन करताच हिरण्यकश्यपूने त्याला लाथेने ढकलून दिले. तो कडाडला,

"कारट्या, मला वंदन करतोस. शरम नाही वाटत माझा शत्रू आहेस तू."

"तात, मी आपला पुत्र आहे. पुत्र शत्रू कसा होईल?"

“मलाच विचारतोस. मुलाच्या रूपाने माझा सूडकरी जन्माला आला आहेस.”

“तात...”

“कुलांगारा, ज्याची भुवई वाकडी झाली तर सारं त्रिभुवन थरथर कापतं, त्याच्या सांगण्याविरुद्ध तू वर्तन करतोस? पित्याचा द्रोह करतोस? अरे, हे पाप कुठं फेडशील?”

“हे पाप नाही तात...”

मला शिकवतोस? अरे, या तुझ्या गमज्या कोणाच्या जीवावर चालू आहेत? कोण तुझा पाठीराखा आहे?”

“तात, विष्णू हीच या जगाच्या मुळाशी एकमेव शक्ती आहे. तात, तुम्हालासुद्धा त्या विष्णूपासूनच शक्ती मिळते. तोच जगन्नियंता आहे; आणि तोच माझा, माझाच नव्हे तर साऱ्यांचाच पाठीराखा आहे.”

“विष्णू...विष्णू...मूर्खा, तुझा तो विष्णू आहे तरी कोठे?”

“विष्णू कोठे आहे..., कोठे नाही म्हणून सांगू...? या साऱ्या चलअचल वस्तूंत त्याचाच वास आहे.”

प्रल्हादाच्या या उत्तराने तो अधिकच चिडला. रागाने वेडेवाकडे हातवारे करू लागला. तो त्याच अवस्थेत दारापाशी गेला. दात ओठ खात त्याने प्रल्हादाला विचारले,

“सांग तुझा विष्णू सगळीकडे आहे ना?”

“होय, तात...”

“मग या खांबात आहे...?”

“हो, या खांबात सुद्धा आहे.”

“हे ऐकताच त्याचा क्रोध अनावर झाला. त्याने रागाच्या भरात ताडकन् आपली लाथ खांबावर मारली. तोच एक

भयानक कर्णभेदी आवाज ऐकू आला. त्या आवाजाने सगळेचजण घाबरले. राजमंदिर कोसळून पडते की काय असे वाटायला लागले. एक दिव्य तेज त्या खांबात दिसू लागले. पाहता पाहता एक विचित्र प्राणी बाहेर पडला. त्याचे शिर सिंहाचे होते. दाढा भयंकर होत्या. जीभ तलवारीच्या पात्यासारखी लवलवत होती; आणि त्या प्राण्याचे धड मात्र मानवाचे होते. तो अत्यंत तेजस्वी होता. पण त्याची तीक्ष्ण नखे भीषण शस्त्रासारखी होती. त्याचा खांबातून बाहेर येण्याचा आवेग आणि आवेश पाहून सारे सेवक भीतीने पळून गेले. हिरण्यकश्यपू ते पाहताच, हा आपल्याला पकडणार असे समजून हातातील गदेचा प्रहार त्याच्यावर केला. तो चुकवीत त्या प्राण्याने हिरण्यकश्यपूला पकडले. मांजर जसे उंदराला किंवा गरुड जसा सर्पाला पकडतो तसे!

एव्हाना संध्याकाळ झाली होती, दिवसही नव्हता आणि रात्रही नव्हती. त्याने त्या दैत्याला उचलून उंबऱ्यात आपल्या मांडीवर झोपविले. ती जागा घरातही नव्हती आणि घराबाहेरही नव्हती. आपल्या हातातील नख्यांनीच त्याने हिरण्यकश्यपूचे पोट विदीर्ण केले. त्याची आतडी आपल्या गळ्यात घातली. हिरण्यकश्यपू ठार झाला. ते भयंकर दिसणारे स्वरूप अधिकच उग्र दिसू लागले.

ही सारी किमया प्रल्हाद स्थिर चित्ताने पहात होता. त्याने हात जोडून विष्णूची प्रार्थना केली. ती प्रार्थना ऐकताच भगवंताने आपले उग्र स्वरूप सौम्य केले आणि सांगितले,

"बाळा, तुझी निष्ठा पाहून मी संतुष्ट झालो आहे. माझी भक्ती करताना तुझ्यावर अनेक आपत्ती आल्या तरी तू त्यांना धैर्यानं तोंड दिलंस. आपल्या उद्दिष्टापासून तू ढळला नाहीस."

"प्रभू सारी आपली कृपा."

"तुझ्या धैर्याने मी संतुष्ट झालो आहे. हवा तो वर माग."

"प्रभू, आपला आशीर्वाद असावा हीच माझी इच्छा. आणखी काय मागणार...? पण देवा, द्यायचाच असेल तर एक वर द्या - माझ्या पित्यानं तुमचा प्रभाव न समजून दैत्य कुलाला शोभेल असं वर्तन केलं. त्यांनी ते अज्ञानानं केलं. त्यांना त्यांच्या पापाचं प्रायश्चित्त मिळालं आहे, तेव्हा त्यांना आता सद्गती द्यावी. एवढीच माझी इच्छा आहे."

"धन्य आहे तुझी. बाळा, ज्या पित्यानं तुला इतका त्रास दिला त्यालाही सद्गती मिळावी अशी प्रार्थना करतोस, धन्य आहे तुझी. तुझ्या इच्छेप्रमाणे होवो."

वर देऊन नृसिंहाच्या स्वरूपातील विष्णू अंतर्धान पावले. ते तेज कमीकमी होत नाहीसे झाले. प्रल्हाद मात्र विनम्र होऊन, अजूनही हात जोडून त्या तेजाला वंदन करीत उभा होता.

# स्वाभिमानी नरेन्द्र

रामदेवराव यादवांचा दरबार भरला होता. सर्व लोक आपापल्या जागेवर बसले होते. सर्व प्रधानही उपस्थित होते. एवढ्यात ललकारी झाली. महाराजाधिराज रामदेवराय दरबारात आले. सर्व लोक उभे राहिले. सुवर्णाच्या सिंहासनावर महाराज बसले; मग इतरही बसले.

महाराजांच्या जवळ तीन आसने होती. त्यावर सालकवी, नृसिंहकवी आणि नरेंद्र बसले होते. आज दरबारी कवी साल यांचे रामायणावरील काव्याचे वाचन होते. राजाने आज्ञा करताच सालकवीने आपले काव्य वाचायला सुरुवात केली. रामायणासारखा मधुर विषय. प्रसंगांची चांगली खुलावट, काव्य रंगत चालले. कल्पनांच्या इंद्रधनुष्यात सारेच तल्लीन झाले. 'वा ऽ वा ऽऽ' असे सहजोद्गार दरबारातून येऊ लागले. राजा रामदेवरायही रसिक. सालकवीवर प्रसन्न झाला. तोही आनंदला.

सालकवीला ही प्रशंसा ऐकून धन्य वाटले. सहज त्याचे लक्ष आपल्या भावाकडे, नरेंद्राकडे गेले. त्याच्या चेहऱ्यावर आनंदाचे कोणतेच लक्षण दिसेना. त्याने आपले काव्यवाचन क्षणभर थांबविले. नरेंद्राचेही लक्ष त्याकडे वेधले गेले; आणि तो मोठ्या आवाजात गरजला, 'यापेक्षा श्रीकृष्णाचे चरित्र गायिले असते तर तुमची पापे तरी नाहीशी झाली असती.'

नरेंद्राच्या आवाजाने सारा दरबार चकित झाला. रामदेवरायही अवाक् होउन क्षणभर त्याच्याकडे पहात राहिला. आपल्या भावाचे उद्गार ऐकून सालकवीलाही राग आला. 'भर दरबारात असे बोलणे?' तो व्यथित झाला आणि

देवाचेया दादुलेपणाचा उबारा
न सोहेचि सातांही सागरा ।
भेणे वोसरौनि राजभारा
दिन्हली द्वारावती ।

श्रीकृष्णाच्या सामर्थ्याची तीव्रता एवढी प्रचंड होती की, सातीही सागरांना खंडणी म्हणून श्रीकृष्णाला सोन्याची द्वारका नगरी अर्पण केली, ही कल्पना ऐकताच रामदेवरावाला गप्प बसवेना. त्याचा चेहरा हर्षाने फुलून आला होता. तो एकदम म्हणाला,

"थांबा, कविराज थांबा..."

नरेंद्र तिकडे पाहताच राहिला.

"कविराज आपल्या काव्यामृताच्या सेवनाने आमचे कान आज तृप्त झाले आहेत."

"महाराज..."

"होय कविराज, आम्ही अंत:करणापासून सांगतो, तुमच्या काव्याने आज आम्ही धन्य झालो आहोत. कविराज एक इच्छा आहे."

"कोणती महाराज ?"

"या काव्याच्या प्रत्येक ओवीसाठी, तुम्ही म्हणाल तेवढी सुवर्णाची नाणी आम्ही तुम्हाला देऊ. पण..."

"पण काय... ?"

पण, या काव्याच्या कर्तृत्वाचा मान तुम्ही आम्हाला द्यावे. हे काव्य तुम्ही आमच्या नावावर करावे."

नरेंद्र चमकला. काय बोलावे त्याला क्षणभर समजेना. पुढच्याच क्षणी त्याचा चेहरा बदलला. निश्चयाचे तेज त्याच्या चेहऱ्यावर तळपू लागले आणि तो निग्रहाने म्हणाला,

"नाही, महाराज...हे अशक्य आहे..."

"कविराज, आम्ही तुम्हाला..."

"महाराज, अशक्य अगदीच अशक्य ! पैशाच्या मोबदल्यात मी तुम्हाला काव्यकर्तृत्व देणार नाही. माझ्या कविकुळात लोक नावे ठेवतील, पैशासाठी हे कवी आपलं काव्य विकतात, आपलं नाव विकतात अशी दूषणं माझ्या कविकुळाला कायमची ऐकावी लागतील आणि ते मला कधीच सहन होणार नाही."



नरेंद्राचे ते तेजस्वी उद्‌गार ऐकून राजा चकित झाला. त्याने पुन्हा बोलण्याचा प्रयत्न केला, पण शब्द तोंडातच विरले. नरेंद्र आपल्या काव्याची पोथी बांधीत होता. तो

आसनावरून उठला. साऱ्यांच्या नजरा त्याच्यावर खिळल्या होत्या. त्याचे भाऊ त्याला समजावू लागले. त्याकडे नरेंद्राचे लक्षच नव्हते. त्याने काव्याची पोथी बांधली, आणि तो निघू लागला. राजा पुन्हा म्हणाला,

'कविराज, थांबा निदान...'

नरेंद्राने राजाकडे एक दृष्टिक्षेप टाकला आणि त्याच तेजस्वी मुद्रेने, ताठ मानेने त्याने दरबार सोडला. त्याच्या पाठमोऱ्या, दूर जाणाऱ्या आकृतीकडे राजा आणि नरेंद्राचा भाऊ, कितीतरी वेळ आश्चर्याने पाहात उभे राहिले होते.

# एक नवी सुरुवात

"हे काय...माझ्या भोवती सारखं रुंजी घालणं मला नाही बाई आवडत..."

"मधुसंचयानं भरलेल्या आणि तारुण्याच्या रंगीबेरंगी पाकळ्यांनी नटलेल्या फुलानं, रुंजी घालण्यासाठी काय मधुकराला आमंत्रण द्यायला लागतं?"

"हं, पुरे...पुरे, जेव्हा तेव्हा...काव्य... !"

"मूर्तिमंत काव्य पुढे असल्यावर ते शब्दांकित कोण करणार नाही?"

"रत्नावली, तुझा हा गौरवर्णीय देह, लांबसडक काळे केस, हे स्वप्नाळू गहिरे डोळे....पाहिलं की वाटतं, आकाशातली कोवळी चंद्रकलाच तर माझ्या घरी आली नाही ना? रम्य हसरी उषा तर अवतरली नाही ना? विजेचं फूल तर अवचित फुललं नाही ना?

"रत्नावली, तुझं हे मूर्तिमंत सौंदर्य मला वेड लावतं! इतकंच नाही, तुझी हालचाल, तुझं चालणं, बोलणं सारं...सारं मला मोहित करतं, मंत्रमुग्ध करतं."

तुलसीदासांनी केलेल्या स्तुतीने अन् त्यांच्या मोहमयी अमृतवाणीने रत्नावली सुखावली. लाजली, पण पुढच्याच क्षणी स्वत:ला सावरून ती म्हणाली,

"नाथ, तुमची प्रीती मला समजते, जाणवते. पण या प्रीतीला कर्तव्याचं सुंदरसं कोंदण नको का? सध्या तुम्ही सारखं माझ्या अवतीभवती वावरता. मला एक क्षणभरही विसंबत नाही पण त्यामुळे तुमच्या कर्तव्यात खंड पडू लागला आहे. लोक काय म्हणत असतील? अन् त्यांनी असं बाईलवेडा

म्हटलेलं मला नाही बाई आवडणार...''

रत्नावली व तुलसीदासांचा विवाह झाला आणि आपल्या सौंदर्याने तिने तुलसीदासांना विद्ध केले. मधाच्या गोडीने वेडावलेला भ्रमर कमलदलातच बद्ध झाला. आपले कर्तव्य विसरू लागला. नदीच्या भोवऱ्यात सापडलेली नाव जशी पुन्हा-पुन्हा तिथेच फिरत रहाते, तसे त्याचे मन सतत रत्नावलीभोवतीच फिरू लागले. प्रवचन करताना, पुराण सांगताना, त्यांना रत्नावलीची आठवण बेचैन करू लागली. त्यांची रसाळ वाणी मधेमधे अडखळू लागली. वाक्‌गंगेच्या प्रवाहात अडथळे येऊ लागले व काही तरी कारणे शोधून तुलसीदास घरी परतू लागले.

ही गोष्ट रत्नावलीच्या लक्षात आली. आपल्यामुळे तुलसीदासांचे लक्ष कशातच लागत नाही, हे बरं नाही, हे तिने जाणले. तिने सूचकतेने त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली.

''हे काय बरं, सारखं घरी असायचं, मला नाही आवडत. अन् लोक तरी काय म्हणतील? आणि असं पहा, तुम्ही सारखे घरी राहिलात, पुराण बंद पडलं तर आपला चरितार्थ कसा चालणार? नुसत्या प्रेमाने पोट थोडेच भरणार?''

कितीतरी वेळा तिने समजावून सांगितले, पण त्याचा उपयोग होईना. त्यांच्या प्रीतिभावनेचे रूपांतर वासनेत होऊ लागले. त्यांचे मन विकाराधीन होऊ लागले. विकारांनी माणसाची विचारशक्तीच नाहीशी होते. त्यांचेही तेच झाले. रत्नावली त्यांच्या दिनचर्येचा केंद्रबिंदू बनली. तिच्यापासून दूर राहणे किंवा तिला दूर पाठवणे ही कल्पनाही सहन होईना.

रत्नावलीच्या वडिलांच्याकडून एक दोनदा पत्रं आली. 'आता बरेच दिवस झाले. रत्नाला चार दिवस माहेरी पाठवा',

असे त्यांनी पुन्हा पुन्हा विनविले होते; परंतु काही ना काही कारणांनी त्यांनी तिला माहेरी पाठविली नाही. त्यांना ते टाळायचेच होते.

एके दिवशी तुलसीदास घरी आले. घरात रत्नावलीचा भाऊ बसलेला होता. त्याच्या अनपेक्षित येण्याने त्यांना आश्चर्य वाटले. कोणतीही भावना चेहऱ्यावर न दर्शविता त्यांनी विचारले,

"कधी आलात?"

"हे काय एवढ्यातच येऊन बसतोय."

"फार दिवसांनी येणं केलंत? का विसरलात बहिणीला?"

" विसरेन कसा? तिच्यासाठी तर आलो."

"म्हणजे आमच्यासाठी नाही तर!"

"असं कसं होईल? आपण काय आम्हाला परके थोडेच आहात? मधे पत्रं पाठविली होती. उत्तरं आली नाहीत, कामामुळे नसेल जमत उत्तर पाठवायला. म्हणून समक्षच आलो. दोघांचीही भेट होईल म्हटलं."

"बर झालं आलात. सारं क्षेम आहे ना?"

"सारं ठीक आहे. पण..."

"पण काय...?"

"लग्न झाल्यापासून आपण ताईला माहेरी पाठविली नाहीत. आईला तिची आठवण होत आहे. तिच्या वाटेकडे अगदी डोळे लावून बसली आहे..."

हे ऐकताच तुलसीदासांच्या कपाळावर एक सूक्ष्म आठी पडली. रत्नावली दाराआडून सारे ऐकत होती. त्यांच्या चेहऱ्यात झालेला हा बदल तिला जाणवला. आता आपल्याला जायला मिळणार नाही हे तिने जाणले. ती निराश झाली. तुलसीदासांच्या चेहऱ्यावरचा बदल तिच्या भावाच्याही लक्षात आल्यावाचून

राहिला नाही. तरीही मनाचा हिय्या करून त्याने विचारले,

"मग पाठवताना चार दिवस? घेऊन जाईन बरोबर. तिलाही थोडा बदल होईल; आणि आम्हा सर्वांनाही बरं वाटेल. चार दिवसांनी मीच परत येऊन पोहोचती करीन".

"घेऊन जायला काही हरकत नाही, आणि बरेच दिवसांत ती माहेरी गेलीही नाही, तेव्हा पाठवायलाही पाहिजे..."तुलसीदासांचे हे वाक्य ऐकून भावाला बरे वाटले. रत्नावली मनातून हरखून गेली; पण पुढच्याच क्षणी तुलसी-दास म्हणाले,

"पण,.:."

अधीरतेने भावाने विचारले, "पण काय?"

घरातल्या काही अडचणींमुळे तूर्त पाठविता येत नाही. तरीही थोड्या दिवसांनी आपण आलात तर जरूर पाठवीन."

निराश होऊन भाऊ निघून गेला. रत्नावली उदास झाली. थोड्या दिवसांनी भाऊ येईल, आपल्याला घेऊन जाईल असा विचार करून तिने आपल्या मनाची समजूत घातली. नाहीतरी माणूस भविष्यातल्या सुखाची स्वप्ने वर्तमानात रंगवितो अन् रूक्ष, कंटाळवाणा, निराश वर्तमान पुढे ढकलीत असतो. आज नाही तरी थोड्याच दिवसांत माहेरी जायला मिळेल या आशेवर ती दिवस घालवू लागली.

दिवस सरत होते. रत्नावलीशिवाय तुलसीदासांना दुसरे काही सुचत नव्हते. जीवनाचा प्रत्येक क्षण रत्नावलीच्या सहवासामुळे आनंदाने भरलेला नि सुखाने भारलेला वाटत होता. उपभोग! जीवनाचे एवढेच तत्त्वज्ञान त्यांच्यापुढे होते. परंतु, उपभोगाने वासनांची तृप्ती होत नसते. विचारी माणसे संयमाची कास धरतात, हे त्यांच्या लक्षात येत नव्हते. प्रवाहाच्या

ओघाने ते वहात होते. ती गतीच स्वाभाविक वाटत होती. यात आपल्या जीवनाचा अध:पात आहे, ही जाणीवहीं त्यांना होत नव्हती. त्यामुळे रत्नावलीच त्यांचे जीवन-सर्वस्व बनली होती.

थोड्या दिवसांनी रत्नावलीच्या वडिलांचे परत पत्र आले. तिला माहेरी पाठविण्याबद्दल. उत्तर आले नाही. येणे कठीण, हे त्यांनाही पटले होते.

आणखी काही दिवस उलटले. श्रावण जवळ आला. पंचमीला माहेरवाशिणी घरी जातात. रत्नावलीला उत्कटतेने आठवण येऊ लागली. कधी उचकी लागली तर 'आईनंच आठवण काढली असेल' असे तिला वाटू लागले. माहेरच्या आठवणी कधीमधी एकांतात, काळोखात डोळ्यांतून झरू लागल्या. ती बेचैन झाली. अस्वस्थ झाली. तुलसीदासांच्या लक्षात या गोष्टी येत नव्हत्या असे नाही; पण तिच्या सहवासाने अजून मन तृप्त झाले नव्हते. तिचा विरह मन सहन करू शकणार नव्हते. त्यामुळे ते गप्प होते, हा विषयही काढत नव्हते. रत्नावली गप्प होती, कारण विचारून काही उपयोग होणार नाही याची तिला खात्री होती. मनातले दु:ख मनातच दडवून वावरत होती. आला प्रसंग हसून साजरा करीत होती.

रत्नाची आईही भेटीसाठी आतुरली होती. खंतावली होती. तिच्या आठवणीने डोळ्यांतून आसवे झरत होती. 'आता निदान पंचमीला तरी पाठवतील, तशी रुढीच आहे'. असं तिला वाटले. तिने मुलाला बोलवून, "कसंही कर नि दोन दिवस तरी तिला घेऊन ये." असे डोळ्यांत पाणी आणून सांगितले. तो पुन्हा तिच्या घरी आला. तुलसीदास बाजारात गेले होते. एका दृष्टीने इष्टापत्तीच होती ती. भाऊ घरी

राहिला नाही. तरीही मनाचा हिय्या करून त्याने विचारले,

"मग पाठवताना चार दिवस? घेऊन जाईन बरोबर. तिलाही थोडा बदल होईल; आणि आम्हा सर्वांनाही बरं वाटेल. चार दिवसांनी मीच परत येऊन पोहोचती करीन".

"घेऊन जायला काही हरकत नाही, आणि बरेच दिवसांत ती माहेरी गेलीही नाही, तेव्हा पाठवायलाही पाहिजे..."तुलसीदासांचे हे वाक्य ऐकून भावाला बरे वाटले. रत्नावली मनातून हरखून गेली; पण पुढच्याच क्षणी तुलसी-दास म्हणाले,

"पण,..."

अधीरतेने भावाने विचारले, "पण काय?"

घरातल्या काही अडचणींमुळे तूर्त पाठविता येत नाही. तरीही थोड्या दिवसांनी आपण आलात तर जरूर पाठवीन."

निराश होऊन भाऊ निघून गेला. रत्नावली उदास झाली. थोड्या दिवसांनी भाऊ येईल, आपल्याला घेऊन जाईल असा विचार करून तिने आपल्या मनाची समजूत घातली. नाहीतरी माणूस भविष्यातल्या सुखाची स्वप्ने वर्तमानात रंगवितो अन् रूक्ष, कंटाळवाणा, निराश वर्तमान पुढे ढकलीत असतो. आज नाही तरी थोड्याच दिवसांत माहेरी जायला मिळेल या आशेवर ती दिवस घालवू लागली.

दिवस सरत होते. रत्नावलीशिवाय तुलसीदासांना दुसरे काही सुचत नव्हते. जीवनाचा प्रत्येक क्षण रत्नावलीच्या सहवासामुळे आनंदाने भरलेला नि सुखाने भारलेला वाटत होता. उपभोग! जीवनाचे एवढेच तत्त्वज्ञान त्यांच्यापुढे होते. परंतु, उपभोगाने वासनांची तृप्ती होत नसते. विचारी माणसे संयमाची कास धरतात, हे त्यांच्या लक्षात येत नव्हते. प्रवाहाच्या

ओघाने ते वहात होते. ती गतीच स्वाभाविक वाटत होती. यात आपल्या जीवनाचा अध:पात आहे, ही जाणीवहीं त्यांना होत नव्हती. त्यामुळे रत्नावलीच त्यांचे जीवन-सर्वस्व बनली होती.

थोड्या दिवसांनी रत्नावलीच्या वडिलांचे परत पत्र आले. तिला माहेरी पाठविण्याबद्दल. उत्तर आले नाही. येणे कठीण, हे त्यांनाही पटले होते.

आणखी काही दिवस उलटले. श्रावण जवळ आला. पंचमीला माहेरवाशिणी घरी जातात. रत्नावलीला उत्कटतेने आठवण येऊ लागली. कधी उचकी लागली तर 'आईनंच आठवण काढली असेल' असे तिला वाटू लागले. माहेरच्या आठवणी कधीमधी एकांतात, काळोखात डोळ्यांतून झरू लागल्या. ती बेचैन झाली. अस्वस्थ झाली. तुलसीदासांच्या लक्षात या गोष्टी येत नव्हत्या असे नाही; पण तिच्या सहवासाने अजून मन तृप्त झाले नव्हते. तिचा विरह मन सहन करू शकणार नव्हते. त्यामुळे ते गप्प होते, हा विषयही काढत नव्हते. रत्नावली गप्प होती, कारण विचारून काही उपयोग होणार नाही याची तिला खात्री होती. मनातले दु:ख मनातच दडवून वावरत होती. आला प्रसंग हसून साजरा करीत होती.

रत्नाची आईही भेटीसाठी आतुरली होती. खंतावली होती. तिच्या आठवणीने डोळ्यांतून आसवे झरत होती. 'आता निदान पंचमीला तरी पाठवतील, तशी रुढीच आहे'. असं तिला वाटले. तिने मुलाला बोलवून, "कसंही कर नि दोन दिवस तरी तिला घेऊन ये." असे डोळ्यांत पाणी आणून सांगितले. तो पुन्हा तिच्या घरी आला. तुलसीदास बाजारात गेले होते. एका दृष्टीने इष्टापत्तीच होती ती. भाऊ घरी

येताच रत्नावली आनंदली. कितीतरी वेळ तिच्या डोळ्यांतून आसवे झरत होती. भावाने तिला शांत केले. तिनं विचारलं,

"भाऊ, आई कशी आहे रे? अन् बाबा..."

"ठीक आहेत. पण सारे तुझ्या भेटीसाठी..."

पुन्हा गंगायमुना झरू लागल्या. त्यांना कष्टाने आवरत ती म्हणाली,

"मलाही वाटतं रे; पण काय करू..."

" ते काही नाही, आता तुला माझ्याबरोबर आलंच पाहिजे. आईने सांगितलं आहे, 'कसंही कर नि पोरीला दोन दिवस तरी घेऊन ये'. तेव्हा आलं हे पाहिजेच."

"भाऊ, हे बाहेर गेले आहेत."

"म्हणूनच मी म्हणतो, आत्ताच चल."

"त्यांना न विचारता?"

"वेडे, ते आल्यावर तुला कधीतरी यायला मिळेल का?"

रत्नावलीच्या डोळ्यांसमोर भूतकाळ तरळला. वडिलांची अनुत्तरित पत्रे दिसली. गेल्या वेळी भावाला सांगितलेल्या गोष्टी आठवल्या. तिचे मन दोलायमान झाले.

"काय करावं? जावं का? भाऊ म्हणतोय तेच खरं आहे. आत्ताच गेलं तर जमेल. पंचमी झाल्यावर येऊ परत. फक्त आठ दिवसांचा तर प्रश्न आहे. आई भेटेल...मैत्रिणी भेटतील...काय करू? जावं...जाऊ नये..."

तिच्या मनाचा निश्चय होईना. तिच्या मनाची ही स्थिती भावाने जाणली. समजावणीच्या सुरात तो म्हणाला,

"रत्ना, मी सांगतो, ऐक. लग्न झाल्यापासून तू आली नाहीस. आई तर तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसली आहे.

सगळ्यांच्या गाठीभेटी होतील. नाही म्हणू नकोस. बरं, आठ दिवसांनी परत ये. एवढ्यात ते आले तर तुला येता येणार नाही. बघ, विचार कर."

रत्नावलीला भावाचे म्हणणे मनोमन पटले. तोच तिच्या डोळ्यांसमोर तुलसीदासांची मूर्ती आली. आपल्याशिवाय क्षणभरही न राहणारे! न विसंबणारे! प्रत्येक गोष्टीचे काव्यात समर्थन करणारे! लगेच तिच्या मनात आले,

आपल्यामुळे हा कविहृदयांचा माणूस पिंजऱ्यात अडकला आहे. त्याची गगनविहारी प्रतिभा भूमीवर घुटमळु लागली आहे. केवळ आपल्यामुळे!

हे टाळलं पाहिजे. त्यांना योग्य मार्गावर आणणं हा आपला धर्म आहे. ते माझं कर्तव्य आहे. काम ही भावना अगदी स्वाभाविक आहे, पण तिचं विकारात रूपांतर होणं चांगलं नाही. माणसाचा कोणताही विकार सदैव विकार या स्वरूपात राहिला तर त्याचे उन्मादात रूपांतर होण्याचा संभव असतो. हा उन्माद माणसाचा सदैव अध:पात करतो. त्याला योग्य वेळीच संयम शिकवणं आवश्यक आहे. उदारतेचा स्पर्श व संयमं हेच विकारांना संयम घालू शकतील. मलाही असा प्रयत्न करायला हवा."

"रत्ना, अगं कसला एवढा विचार करतेस? ऐक माझं चल."

भानावर येत ती म्हणाली,

"चल, मी तुझ्याबरोबर येते. हे घरी यायच्या आत आपण जाऊ या."

भानावर येत ती म्हणाली,

रत्नावली भावाबरोबर माहेरी निघून गेली.

तुलसीदास घरी आले. घर शांत होते. रत्नावली त्यांना कोठेही दिसेना. त्यांचे डोळे घरातील प्रत्येक दालनातून भिरभिरू लागले. ती कोठे बाहेर गेली अशी कल्पना करून; अधीरतेने त्यांनी काही काळ कंठला. प्रहर-दीड प्रहर उलटून गेला. ती आली नाही. दिसली नाही. ते अस्वस्थ झाले. बेचैन झाले. क्षणाक्षणाला अस्वस्थता वाढत गेली.

घर शून्यवत दिसू लागले. जिथे रत्नावलीची छाया नाही ते घर उजाड भासू लागले. हेमंत ऋतूतल्या थंडीच्या मारामुळे गंधहीन, निस्तेज झालेल्या कमलासारखे भासू लागले. घरातील प्रत्येक वस्तू त्यांना तिची आठवण करून देऊ लागली. प्रत्येक क्षण त्यांना तिचे स्मरण देऊ लागला. अस्वस्थता वाढू लागली. दूर अंतरावर विरत जाणारे गाण्याचे आर्त स्वर जसे मनाला व्याकूळ बनवितात, तसे प्रियेच्या विरहाने त्यांना व्याकूळ बनविले. 'कुठे गेली असेल ती? अजून कशी आली नाही?' हे प्रश्न त्यांना सतावू लागले. विचार करता करता त्यांना वाटलं, 'ती माहेरी तर गेली नसेल?' पुन्हा विचार आला.

"पण एकटी कशी जाईल?"

"भाऊ आला असेल तर? श्रावण आला. पंचमीला न्यायला आला असेल तो..."

"मला न विचारता?"

"विचारल्यावर तू 'हो' म्हणाला असतास का? तिला का हे माहीत नाही? भावानेही भरीला घातलं असेल."

आणि विचार करता करता त्यांची खात्री झाली की, ती माहेरीच गेली असणार. त्यांनीही ठरवले, आपणही जायचे. तिला भेटायला तिच्या माहेरी जायचे. अतृप्त मनाने या विचाराला

साथ दिली आणि तुलसीदास रत्नावलीच्या माहेरी जायला निघाले.

तुलसीदास निघाले ते संध्याकाळ होत आली होती. खाली वाकलेल्या पावसाळी ढगांनी अंधार अधिकच दाटला होता. पावसाची रिपरिप चालूच होती. वाराही जोरात वहात होता. थोड्या वेळातच अंधार अधिकच दाटून आला. गुढगा गुढगा चिखलात आपल्याच पायांचा होणारा आवाज भीतिदायक वाटत होता. निर्मनुष्य रस्त्यावर तुलसीदास एकटेच चालले होते. आपल्याच सोबतीने! त्यांना भोवतालच काही कळत नव्हते. एकच ध्यास होता. रत्नावलीची भेट! त्यासाठी सारा आटापिटा चालला होता. धर्माची, नीतीची, कुळाची लाज सोडून!! कामातुर मानसाला भीतीही नसते नि लाजही, हेच खरं!

चालता चालता मध्यरात्र होत आली होती. चमकणाऱ्या विजांच्या प्रकाशात मार्ग दिसत होता. रस्त्यात नदी आडवी आली. दुथडी भरून वाहत होती; जणू तुलसीदासाला अडवून सांगत होती,

"वेड्या, मागे फीर!असा उतावळा होऊ नकोस. आपलं कुल, शील याला कमीपणा येईल असं काही करू नकोस. अरे, खऱ्या प्रेमाला मीलनाची आवश्यकता असते असे नाही. प्रेम दोन देहांतलं अंतर मोजीत नसतं, त्याला हवी असते दोन हृदयांची एकता! दोन मनांचे सुसंवादी सूर!!

विकाराने वेड्यापिशा झालेल्या तुलसीदासांना हे स्वर कसे ऐकू येणार? ते नदीच्या तीरावर आले. क्षणभर विचार पडला,'आता काय करावं? अपरिचित नदी. पाण्याचा अंदाज नाही. जाणार कसे? 'काय योग आहे...रत्नावलीवरची माझी

प्रीती मला तिच्याकडे घेऊन जाईल. त्या उत्कट प्रीतीमुळेच हा ओंडका माझ्या मदतीला आलेला दिसतोय. हा नेईल आपल्याला पैलतीरी!' ते त्या प्रेतावर बसले. पैलतीरी गेले. अंधारातच रत्नावलीच्या माहेरघरी पोहोचले.

रत्नावली ज्या माडीवर झोपत होती ती जागा त्यांना माहीत होती. प्रश्न होता कोणालाही न कळता तिथे जायचे कसे? त्यांनी माडीवर दृष्टी टाकली. अवती भवती पाहिले. अंधाराचे पांघरूण घेऊन सारे जग शांत झोपले होते. संथ लयीत पडणाऱ्या पावसाचे अंगाई गीत चालले होते. ते माडीकडे पुन्हा पुन्हा पहात होते. वर जाण्याचा विचार करीत होते. पाहता पाहता त्यांना दिसलं, माडीवरच्या खिडकीतून एक मोठी दोरी खालपर्यंत आली आहे. दोरी कसली एक भयंकर साप होता तो! पण तुलसीदास रत्नावलीच्या भेटीसाठी इतके उतावीळ झाले होते की, रात्रीच्या अंधारात तो साप त्यांना दोरीच वाटला. त्यांना आनंद झाला. ते त्याला धरून वर गेले.

रत्नावली तिच्या खोलीत शांत झोपली होती. दिवा मंद तेवत होता. तिला पाहताच त्यांना कमालीचा आनंद झाला. ते धावतच तिच्यापाशी गेले. तिचे दोन्ही बाहू आपल्या हाताने पकडले. तिला हलवीत म्हणाले, रत्ना...रत्ना...मी आलोय...मी' गार स्पर्शाने ती एकदम जागी झाली.

"कोण...तुम्ही?"

"हो रत्ना...मीच...मी आलो आहे."

"रत्नावली झटकन उठून बसली. तिची चर्या एकदम बदलली. आपले पती असे एकाएकी आणि एवढ्या रात्री येतील हे तिला खरे वाटेना. क्षणभर तिच्या डोळ्यांवर विश्वास

बसेना, पण विश्वास ठेवण्यावाचून इलाज नव्हता. 'उद्या सगळ्यांना कळल्यावर मला मेल्याहून मेल्यासारखं होउन जाईल. काय सांगायचं साऱ्यांना! आणि ही कसली अभिलाषा! पशूंनाच शोभून दिसते. क्षणभरात तिने स्वतःला सावरले. ती दूर उभी राहिली. तुलसीदासांचा तिला मनापासून राग आला. ती रागाने लाल लाल झाली, तरी त्यांच्या ते लक्षातही आले नाही. ते पुढे जाऊ लागताच ती कडाडली,

"तिथेच थांबा. एक पाऊलही पुढे येऊ नका."

तिची ही प्रतिक्रिया त्यांना अनपेक्षित होती. ते स्नेहाळ शब्दांत म्हणाले,

"रत्ना...तू बोलतेस हे...मी तुझ्या प्रेमासाठी इतक्या रात्री..."

"माझ्या प्रेमासाठी की माझ्या शरीराच्या?

"तुझ्या प्रेमासाठी."

"खोटं! साफ खोटं. तुम्ही माझ्या शरीरासाठी आलात. तुमची वासना अनावर झाल्यानं तुम्ही आलात. तुम्हाला संयम पाळता आला नाही म्हणून तुम्ही आलात. नाथ, काय केलंत हे...? तुम्ही धर्म, घराण्याच्या मर्यादा सारं काही या वासनेपायी धुळीला मिळविलंत. संयमी पुरुष स्त्रीलाही आवडतो नि समाजालाही. कसं समजत नाही तुम्हाला?"

"रत्नावली, पण माझं ऐकून तर घेशील..."

तुलसीदास आपली चूक मान्य न करता आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण करू इच्छितात, हे पाहिल्यावर तिचा संताप अनावर झाला. ती ताडकन म्हणाली,

मला काही एक ऐकायचं नाही,

"लाज न लागत आपु को, दौरे आयहु साथ।

धिक् धिक् ऐसे प्रेम को, कहा कहौं मैं नाथ ।।
अस्थि चरम मय देह मम, तामें जैसी प्रीति ।
तैसी जो श्रीराम महँ, होति न तौ भवभीति ।।''

''तुम्ही आता राम-दास नाही काम-दास झालात. या शरीराच्या मोहानं तुम्ही इथं आलात; पण हे शरीर नश्वर आहे. हे तारुण्य नाहीसं होणारं आहे. पहा... पहा याच्याकडे, ज्यानं तुम्हाला मदिरेची मादकता दिली, ते हे शरीर फक्त हाडा-मांसाचं बनलं आहे. पहा नीट पहा ! या नश्वर शरीरावर जेवढं प्रेम केलंत तेवढं तुमच्या रामावर केलं असतं तर हा दुस्तर भवसागर पार करता आला असता. शाश्वत सुखाचा मार्ग निश्चितच सापडला असता. अजून सावध व्हा तुलसीदास ! अजून विचार करा...''



एवढे बोलून रत्नावली शांत उभी राहिली. तुलसीदासांनी तिच्याकडे पाहिले. दिव्याच्या मंद प्रकाशात ती वेगळीच दिसू लागली होती. श्वेतवस्त्र परिधान केलेली, डोळ्यांत कोटी-कोटी

तारकांचं तेज सामावलेली, स्कंधावर काळे केस रुळणारी, ती महन्मंगल देवी भासू लागली. वीणेचा मंजूळ आवाज त्यांच्या कानात ऐकू येऊ लागला. सूर जुळले होते. तारा छेडल्या जात होत्या. विकार झडून गेला होता. उरले होते, शुद्ध, सात्विक मन ! चिरंतनाचा ध्यास लागलेले. तुलसीदासांची पावले नकळत पुढे पडली. हात जोडले गेले. मस्तक नम्र झाले. मुखातून उद्गार आले,

"चूक झाली, देवी..... आज जीवनाचं सार उमगलं. आशीर्वाद दे.... देवी आशीर्वाद दे !".

तुलसीदासांनी रत्नावलीला नमस्कार केला. तोंड फिरवले आणि ते घराबाहेर पडले. एव्हाना पहाट झाली होती. फटफटले होते. अंधाराचा पाठलाग करून उजेडाने त्याला दूर सारले होते. तुलसीदासांच्या आयुष्यात एक नवी सुरुवात होणार होती.

रत्नावली सारे न्याहाळत होती. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. एका डोळ्यांतून पतिविजयाचे सुख ओसंडत होते आणि दुसऱ्यातून पतिविरहाचे दुःख झरत होते.

❀ ❀ ❀

# अमर बलिदान

रात्र थकली होती. अष्टमीचा अर्धा चंद्र मावळतीच्या क्षितिजाला टेकला होता. तारबियतखानाच्या सैन्याचा प्रचंड तळ पडला होता. बहुतेक सारे दारूच्या नशेने झिंगून झोपले होते. क्वचित एखाद्या ठिकाणी जाग होती पण तीही नशेत बुडलेली! एका तंबूत मात्र सावध हालचाल जाणवत होती. त्या नीरव शांततेत भरल्या आवाजात शब्द उमटले,

"बेटा, आजपर्यंत अनेक पित्यांनी आपल्या मुलांना मौल्यवान भेटी दिल्या असतील; पण आज स्वराज्यासाठी, स्वातंत्र्यासाठी हा तुझा पिता तुझ्या पायात बेड्या अडकवीत आहे."

खंडो बल्लाळने आपल्या पंधरा-सोळा वर्षांच्या मुलाच्या, बहिरवच्या पायात बेड्या चढविल्या. त्याच्या पाठीवरून हात फिरविला. त्याच्या चेहऱ्यावर विलक्षण तेज झळकत होते. जड शब्दांत त्यांच्या तोंडून शब्द उमटले,

"बाळा,..."

"बाबा, आज मी कृतार्थ आहे. स्वातंत्र्यासाठी, स्वराज्यासाठी आल्लेल्या संकटाला धैर्यानं तोंड देत जा." हा उपदेश मी पाळला आहे. आता एक क्षणभरही तुम्ही इथं थांबू नका."

"थांब बाळा ! तुला एकदा डोळे भरून पाहू दे. परत एकदाच तुझ्या पाठीवरून प्रेमानं हात फिरवू दे. आता पुन्हा भेट... कदाचित्..."

"बाबा ! मुसलमानांचा कैदी बनलेल्या या पुत्राचा हा शेवटचा नमस्कार स्वीकारा. आईलाही माझा नमस्कार

सांगा. तिला म्हणावं...''

''बाळ... बाळ...''

'तिला सांगा, वाईट वाटून घेऊ नकोस. लहानपणी मला अभिमन्यूची गोष्ट सांगितली होतीस ना ? त्या धैर्यमेरूचा आदर्श माझ्या डोळ्यांसमोर आहे. या तुझ्या वीरपुत्राला आशीर्वाद दे.''

''बाबा, आता तुम्ही जा. लवकर निघा.''

''बाळ...जातो मी. जपून...रहा.''

शिसे भरल्या पायाने आणि जड अंत:करणाने खंडोजी तेथून निघाला. दूरवर झपाट्याने अस्पष्ट होत जाणाऱ्या खंडो बल्लाळच्या आकृतीकडे तो पहात राहिला. आकृती दिसेनाशी होताच तो खाली बसला. क्षणभरच त्याच्या मनात आले, '' आता मी इथे एकटा बंदीवासात ! उद्या काय होईल...'' पण दुसऱ्याच क्षणी त्याने स्वत:ला सावरले.

निराशेच्या आणि भीतीच्या छाया धैर्यवान माणसांना फार काळ भेडसावू शकत नाहीत.

त्याच्या जवळ होता त्याचा दृढनिश्चय ! वेळ पडल्यास आत्मसमर्पण करण्याची तयारी !! त्यामुळे त्याला धीर आला. आपण केलेल्या कृतीचा त्याला अभिमान वाटला आणि त्या भयाण वातावरणातही दोन दिवसांतल्या घटना त्याच्या डोळ्यांपुढे तरळत राहिल्या.

मोगलांच्या टापांखाली महाराष्ट्र भरडला होता. राजाराम-महाराज जिंजीला जाऊनही बरेच दिवस होऊन गेले होते. प्रत्येक सैनिक स्वातंत्र्यासाठी पराकाष्ठेची झुंज देत होता. स्वातंत्र्याची ज्वाला प्रत्येकाच्या अंत:करणात प्रज्वलित झाली होती. ती नाहीशी करणे मोगलांना अशक्य होते, सारा महाराष्ट्र

मोगलांविरुद्ध उठला होता.

बहिरव आणि त्यांचे सवंगडीही या कार्यात सहभागी झाले होते. बहिरवला तर खंडोजीने आणि त्याच्या आईने सुसंस्कारात घडवले होते. त्याच्या आजोबांपासून सारे स्वराज्यासाठी झटत होते. त्यांचा आदर्श त्याच्या डोळ्यांसमोर होता. आपल्या कुवतीप्रमाणे तो महाराजांना मदत करीत होता.

मोगल सरदार तारबियतखानाचा तळ महाराष्ट्रात होता. त्याच्या कारवाईची माहिती महाराजांना समजणे आवश्यक होते. खंडोजी जिंजीहून साताऱ्याला गेला होता. त्यांचीही काही वार्ता बहिरवला समजली नव्हती. स्वार रवाना झाले होते; पण अजून काहीच समजत नव्हते. आणि एके दिवशी सायंकाळी दोन स्वार दौडत येताना दिसले. बहिरवची उत्सुकता शिगेला पोहोचली. ते घोड्यावरून खाली उतरले. शरीर दमले होते. चेहरा सुकला होता. पुढे जाऊन त्यांनी बहिरवला मुजरा केला. क्षण-दोन क्षण शांततेत गेले. बहिरवला तो काळ केवढा वाटला. ते गप्प का आहेत त्याला कळेना. शेवटी त्यानेच कोंडी फोडली.

"काय रे, गेला होतास ना खानाच्या छावणीजवळ?"

"जी धनी."

"मग काही बातमी...?"

"धनी,...धनी..."

"सांग बोला काय आहे ते."

"धनी, आपल्या धन्याला, चिटणीसांना खानानं पकडलं हाय. त्यांना कैदेत टाकलं हाय."

बहिराव काही काळ भांबावला. वडिलांच्या या अटकेच्या

बातमीनं तो गोठून गेला. शब्द उच्चारण्याचं भान त्याला राहिलं नाही.

"धनी,..."

"हं..."त्यानं स्वत:ला सावरीत विचारलं, "खानानं त्यांना कैदेत टाकलं काय? कधी?"

"कालच्याला. चिटणीस सातारहून जिंजीकडे जात होते. खानाची माणसे पाळतीवर होती. छावणीजवळच त्यांना पकडलं."

"ठीक आहे. तुम्ही महाराजांना ही खबर तातडीनं द्या."

"अन्, धनी तुम्ही, तुम्ही नाय येत तिकडं? सुटकेचा उपाय शोधाया हवा."

"तुम्ही जा. महाराजांना सारं सांगा. मला काही जमलं तर मी बघतोच,"

"जशी आज्ञा."

स्वारांनी परत घोड्यावर मांड ठोकली. धूळ उडवीतच आल्या रस्त्याने ते दोघेही दिसेनासे झाले. बहिरव सुन्न होऊन बसला होता. "वडिलांना अटक? स्वराज्याच्या चिटणीसांना अटक? यातून मार्ग कसा काढणार? महाराज सैन्य घेऊन जातील आणि सोडवतील अशी आशा तर मुळीच नव्हती. काय करावं?" बहिरवपुढे अनेक प्रश्नचिन्हे फिरत होती. संकट भेसूर होते. त्याला धैर्याने तोंड देणे आवश्यक होते. विचार करीत करीत बहिरव घरी आला.

रात्र झाली होती. आईने निरांजन लावले होते. ते तबकात ठेवून ती देवाला ओवाळत होती. हात थरथरत होते आणि थरथरत्या हाताबरोबरच ज्योतही थरथरत होती. बहिराव आत आला. त्याच्या भावविवश हाकेने शांतता हेलावली.

"आई..."

तिनं थरथरत्या हातानं तबक खाली ठेवलं आणि मागे वळून पाहिलं.

''बाळ,...''

''आई, बाबांचा निरोप घेऊन दूत आले होते.''

''हो. सारं समजलं मला. बहिरव...बहिरव, आता काय होईल रे...? ''दुःखाचा उमाळा आवरणं तिला कठीण गेलं. आतापर्यंत दाबून ठेवलेलं दुःख आपल्या कर्त्या मुलाच्या खांद्यावर अश्रूंच्या रूपानं झरझर ओघळू लागलं.

''आई...आई असा धीर सोडून कसं चालेल? सारं काही ठीक होईल. मी महाराजांना सांगावा धाडलाय.''

''बेटा, महाराज काय करणार? त्यांना शक्य असतं तर मग काळजी नव्हती; पण बाळ, आज...आज मला त्यांचं लक्षण धड दिसत नाही रे...''

''आई काळजी करू नको. आई मी असेपर्यंत तू कोणतीही शंका मनात आणू नकोस. मी त्यांना सोडवीन.''

''तू सोडवशील...? वेड्या कसं शक्य आहे ते? खानाच्या येवढ्या सामर्थ्यापुढे तुझा काय पाड लागणार बाबा...वणवा कुठं फुंकरीनं विझवता येईल का? छे, मला तर काही समजेनासं झालं आहे.''

''आई, काळ क्रूर बनला, दैव निष्ठूर झालं तरी आपण खचून कसं चालेल? कोठल्याही संकटाला धैर्याने तोंड द्यावं असं तूच शिकवीत होतीस ना? अगं आता ते करण्याची वेळ आली आहे. तू काही काळजी करू नकोस.''

''बाळ...इतकं सोपं असतं तर मलाही बरं वाटलं असतं. तुम्ही बाप-लेक अगदी सारखे आहात. तुम्हाला कितीही सांगितलं तरी तुम्ही तुमच्या मनात असेल तेच करणार. मागे हे नव्हते शंभूराजांना वेषांतर करून सोडवायला गेले?''

आईचे हे शब्द ऐकताच बहिरवचा चेहरा एकदम चमकला. काहीतरी नवीन सापडल्याचा त्याला भास झाला. त्याच्या मनात लखूकन कल्पना चमकून गेली, "वेषांतर....पुन्हा एकदा तोच प्रयोग.. गनिमीकावा.. आई भवानी, या तुझ्या लेकराला यश दे " .. त्याने आईचे सांत्वन केले आणि पुन्हा सांगितले,

"आई, मी पण जाईन वेषांतर करून आणि बाबांना सोडवीन."

"नाही, नाही.. ते कसायाच्या ताब्यात अडकले आहेत आणि तूही जाऊ नकोस. माझा विचार कर. मी कोणाकडे पाहू?"

"असे निराशेचे विचार आई तुझ्या तोंडी शोभत नाहीत."

"खरं आहे; पण, आईच्या मनाची कल्पना तुला यायची नाही.माया वेडी असते. अशा वेळी वाईट तेच तिला दिसतं. नको तेच मनात येतं. बाळा, या लहान वयात जर काही..."

"आई, पराक्रम वयावर अवलंबून नसतो.अभिमन्यू माझ्याच वयाचा नव्हता का? त्यानं चक्रव्यूहात उडी घेतली. सूर्यालाही दिपवलं त्यानं. तसाच मीही..."

"त्यावेळी रणांगणावर जाताना सुभद्रेला काय वाटलं असेल याचा विचार केलास कां? सुभद्रेच्या डोळयांतील अश्रूंनीच त्याला ओवाळलं होतं, आणि नंतर त्याच तबकात तिच्या अश्रूंच्या सरीच्या सरी कोसळल्या होत्या हे विसरून कसं चालेल?"

भावनेनं भारावलेल्या आईची बहिरवने खूप समजूत घातली. समजावून सांगितले; पण तिने आपला हेका सोडला नाही. तिने अखेरीस सांगितले,

"बाळा, माझ्यातली वीरमाता तुला आनंदाने परवानगी देत असली तरी माझ्यातली आई... आई अनेक शंका-कुशंकांचं ज़ाळं विणून मला पुन्हा पुन्हा बजावीत आहे, बहिरवला पाठवू नकोस. बहिरवला पाठवू नकोस."

बहिरवनं मन घट्ट केलं. आईच्या मनाविरुद्ध बोलताना त्याला यातना होत होत्या; पण त्यानं मनाला बजावलं, स्वराज्य-रक्षणार्थ निघालेल्या माणसाने मायेचे मुलायम पाश आपल्या हाताने दूर सारायचे असतात. त्यात अडकून बसणाऱ्या माणसाला आपले कार्य करता येत नाही.

त्यानेही तितक्याच निश्चयाने आईला सांगितले,

"आई, तू वीरमातेचाच कौल मान, आई.

"बहिरवपेक्षा राष्ट्र मोठं आहे. आज स्वराज्याकरिता, स्वातंत्र्याकरिता ज़र रक्ताचे अर्घ्य हवे असतील तर रक्ताचे सडे शिंपून त्याचे अर्घ्य देणं माझं कर्तव्य आहे.

"आई, स्वातंत्र्यरक्षणासाठी बाबांची राष्ट्राला गरज आहे. त्यांच्याबदली मी गेलो तर विशेष बिघडणार नाही. मला त्यांना सोडवलंच पाहिजे. मी त्यांना सोडवीन. आई, मला आशीर्वाद दे."

आईच्या पायावर डोके ठेवून त्याने नमस्कार केला आणि एका क्षणात तो तेथून निघून गेला. "बहिरव,..." अशी मारलेली हाक हवेत विरून गेली; पण बहिरवने मागे वळूनसुद्धा पाहिले नाही.

बहिरव घराच्या बाहेर पडला तो वडिलांना सोडवून आणायचे या निश्चयानेच. 'वेषांतर' हे एकच साधन त्याच्या मनात पिंगा घालत होतं, आणि मग बऱ्याच विचाराने त्याने ठरवलं, फकिराचा वेष करायचा. शत्रूच्या गोटात शिरायचे

ते त्यांच्यासारखे होऊन संशय यायला जागा कमी राहते. संशय न येता शत्रूच्या गोटात जायला मिळाले की निम्मे काम फत्ते!

बहिरव आपल्या मुसलमान मित्राकडे गेला. त्याच्या मित्रमंडळींत इस्माईल हा बहिरवच्या जीवाला जीव देणारा मित्र होता. त्याने सारी हकीगत त्याला सांगितली. ती ऐकताच बहिरवच्या धाडसाचे त्याला कौतुक वाटले आणि भविष्याच्या कल्पनेने त्याचेही मन शहारले . त्यानं सांगितले,

"बहिरव, फार जोखमीचं काम अंगावर घेतलं आहेस."

"अरे आमच्या घराणाचा हा विशेषच आहे व आमच्याकडे संकटाची ही परंपराच चालू आहे. एक संकट संपतं ते दुसऱ्याला निमंत्रण देऊनच; पण इस्माईल, आम्ही सारे धैर्यवान आहोत. स्वराजाच्या कामी धैर्यवान असायलाच हवं. घाबरून कसं चालेल?"

"ते खरं रे, पण जीवावरचं काय म्हणून जीव घाबरतो."

"जास्तीत जास्त काय होईल, प्राण द्यावा लागेल एवढंच ना? माझी तयारी आहे. तळहातावर शिर घेऊन लढत लढत संकटांशी धैर्याने सामना देण्यातच वीरता असते. मला असंच जीवन आवडतं. रडत-खडत दीर्घकाल जीवन जगण्यापेक्षा क्षणार्धात विजेसारखं तेजस्वीपणे चमकून जाण्यातच खरं शौर्य असतं, नाही का? बरं, इस्माईल ते जाऊ दे मला माझ्या कामात मदत करणार ना?"

"हे काय विचारणं झालं. तू सांगशील ते सारं करीन. तुझ्या तेजस्वी संकल्पाला माझी थोडी मदत झाली तर मला आनंदच होईल. सांग काय मदत करू?"

बराच वेळपर्यंत दोघा मित्रांचे खलबत चालू होते.

अंधार दाटला होता. खलबत संपले होते. आवश्यक ती तयारी झाली होती. बाहेर घोडा फुरफुरत होता. त्या काळ्या-कुट्ट रात्रीच एका फकिराने इस्माईलाचा निरोप घेतला आणि घोड्याला टाच मारली. शांत नीरव रात्रीत घोड्यांच्या टापांचा आवाज मंदावत गेला.

अंधाराशी सामना देत बहिरव तारबियतखानाच्या छावणी-जवळ पोहोचला, एका ओळखीच्या खुणेवर त्याने घोडा बांधून ठेवला. आणि पुढचा मार्ग पायी चालू लागला. छावणी पावला-पावलाने जवळ येत होती. त्याच्या छातीचे ठोके वाढत होते. शत्रूच्या सैन्यात शिरून आत तुरुंगात प्रवेश मिळवायचा. वडिलांना सोडवायचे आणि सुखरूप घरी पाठवायचे. सोपे काम नव्हते. जळत्या वणव्यात शिरून थोडीही इजा न होता बाहेर पडायचं होतं. सापाच्या शेपटीवर पाय देऊन त्याच्या डोक्यावरचा मणी अलगद काढून आणायचा होता. साप तर चावला नाही पाहिजे, मणी तर निसटला नाही पाहिजे. कठीण काम होतं. म्हणूनच बहिरवच्या छातीचे ठोके वाढत होते. बहिरव धैर्यवान खरा, पण शेवटी तोही माणूसच होता. मनाची समजूत घालतच होता. मनावर विजय मिळविण्याचा त्याचा प्रयत्न सारखा चालू होता. अभिमन्यूसारखे चक्रव्यूहात जायचे होते. तंबू स्पष्ट दिसत होते. काही क्षणांत खुद्द छावणीत प्रवेश करायचा होता.

बहिरवने मनाची तयारी केली. वेषांतराने त्याला कोणी अडवले नाही. प्रवेश तर सुकर झाला. आता सारे कठीणच होते. निसर्गाने मात्र साथ द्यायचे ठरवले होते. स्वराज्याचा चिटणीस आपल्या हाती असल्याने सारे खुशीत होते. आपण खूप काही कमावले आहे या गोड स्वप्नात सारे गुंग होते. त्यामुळे दारू पिऊन झिंगून रहाणे, रात्री नाच गाणी ऐकणे

यात छावणी मश्गूल होती. तसे बहिरवकडे, छे, फकिराकडे लक्ष द्यायला कुणालाच सवड नव्हती. त्यातून 'फकिराकडे' कोण लक्ष देतोय? बहिरवचा छावणीतला संचार त्यामुळे बिनधास्त होत होता. बऱ्याच प्रयत्नांनी त्याने आपल्या वडिलांची कैदेची जागा शोधून काढली.

एका तंबूत खंडोजीला ठेवले होते. हातापायांत अवजड बेड्या होत्या आणि तंबूभोवताली होता नंग्या समशेरींचा पहारा. बहिरव पहाऱ्याजवळ पोहोचला. बेधडक आत जायला लागला आणि... आणि पहारेकऱ्याने हटकले,

"क्यूं बे... कौन चाहिये?"

बहिरवने त्या पहारेकऱ्याकडे पाहिले. एक स्मित केले. क्षणभर शांतच राहिला. मग म्हणाला,

"क्या भाईसाब, हम तो फकीर हैं! खानसाबने यहाँ भेजा है!

"खानसाहबने? क्यों?"

"यहां कोई खंडोजीको गिरफदार किया है! मालूम होता हैं वो तो बडा आदमी है! खानसाब उसको मुसलमान बनांना चाहते हैं! इसलिये मुझे यहाँ भेज दिया है ताकि उसे समझ सकूँ!"

"अच्छा, तो ये बात है! जाओ...और समझा दो उस काफिरको!"

बहिरवला आत प्रवेश मिळाला. आत जाताच त्याने बाहेर डोकावले. पहारेकरीही दारू झोकत होते. रात्र चढत होती आणि पहारेकऱ्यांवरील दारूचा अंमलही!

तो आत गेला. बाहेरच्या मशालीचा अंधुक उजेड आत येत होता. तेथेच एका कोपऱ्यात खंडोजीला ठेवलं होतं.

हालचालीबरोबर लोखंडी बेड्यांचा आवाज येत होता: बहिरवने आत पाऊल टाकताच खंडोजीने इकडे तिकडे पाहिले. कोणी तरी आत प्रवेश करीत होता. आधीच त्रासलेल्या त्याने दरडावून विचारले,

"कोण...? कोण आहेस रे तू? शत्रुसैन्यातला कोणी पाहिला की तळपायाची आग मस्तकात जात असताना माझ्या अंगाची आग भडकवायला कोण आलं आहे इथं? बोल..."

बहिरवने इकडे तिकडे पाहिले. कानोसा घेतला. कोणी पाहत नाही, ऐकत नाही याची खात्री करून घेतली. तो खंडोजीजवळ गेला आणि हलक्या आवाजात म्हणाला,

"मी...बाबा?..."

"बहिरव,...तू...अशा वेळी इथं? या मृत्यूच्या जबड्यात कशाला आलास राजा?"

"बाबा, आपल्यासारखी महाप्रतापी माणसं जेथे असतात तो मृत्यूचा जबडा असो, नाहीतर क्रूर काळाची दरी असो, तेथे बेधडक उडी घेण्यातच देहाची कृतार्थता असते."

"राजा, सावकाश बोल...तुला कोणी ओळखलं तर..."

"त्याची काही काळजी करू नका. सारी व्यवस्था चोख करून आलो आहे."

"पण बेटा अशा भयाण काळ्या रात्री येण्याचं धाडस कशाकरता केलंस?"

"काळी रात्र...? बाबा, काळ्या रात्री तर आम्हा मराठ्यांच्या देवता. आम्हाला त्यांचाच आधार असतो. स्वातंत्र्याच्या, स्वराज्याच्या योजना अशा काळ्या रात्रीच तयार होतात आणि अमलात येतात त्याही काळ्या रात्रीच! शिवाजी महाराजांनी स्वराज्याची शपथ घेतली, तानाजीने कोंडाणा सर

केला, तसेच महाराजांनी शाहिस्तेखानाची बोटे तोडली व आगऱ्याला औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन ते निसटले; आणि बाबा...शंभूराजांना सोडवायला आपण गेलात, तेव्हा...तेव्हा सुद्धा अशीच काळी रात्र होती. त्या काळच्या रात्रीच्या कृपेनंच आजचा स्वातंत्र्यसूर्य तळपतो आहे; पण बाबा, एवढ्यावरही स्वातंत्र्यदेवीचं समाधान झालेलं दिसत नाही. तिनेच प्रेरणा देऊन या आणखी एका काळ्या रात्रीची मदत घ्यायला सांगितली आहे.''

''म्हणजे..तू मला सोडवायला आलास? मुलानं बापाला सोडवायचं? बापानं क्रूर होऊन कोवळ्या पोराच्या पायात बेड्या अडकवायच्या? स्वत:ला पळून जाण्यासाठी? छे शक्य नाही..हे कधीच होणार नाही.''

''बाबा, आपल्या स्वराज्यासाठी, महाराजांसाठी हे व्हायला पाहिजे. त्याचीच आज आवश्यकता आहे.''

''बाळ, नको नको, असला विचार करू नकोस!आता मी सुटलो काय अन् बंदिखान्यात खितपत पडलो काय हे फारसं महत्त्वाचं नाही. माझं वय झालं. तुझ्यापुढे सारं आयुष्य उभं आहे. यशाचे डोंगर आता तुम्ही रचायचे. या पडत्या मराठी राज्याला भक्कम आधार देऊन कळस चढवायचा तो तुम्ही!आणि या हिंदुपदपातशाहीचा दरारा उभ्या हिंदुस्थानात निर्माण करायचा तोही तुम्हीच! म्हणून म्हणतो बाळा, आल्या पावली परत जा. महाराजांना सारी हकीगत सांग आणि पुढे येणाऱ्या संकटांना धैर्याने तोंड दे.''

बहिरव शांतपणे सारे ऐकत होता. आपल्या वडिलांना कसे पटवून सांगावे हेच त्याला कळत नव्हते. तरीही त्याने आपला हेका सोडला नाही. वेगवेगळ्या मार्गाने त्यांना पटवून

ठाणे,
३००४ दिनांक

देण्याचा आपला प्रयत्न सुरूच ठेवला. त्याने सांगितले,

"बाबा, अनुभवानं व वयानं मी आपल्यापेक्षा लहान आहे. आज गरज आहे ती आपल्या सारख्या विचारवंतांची, मुत्सद्दी माणसांची. माझ्यासारखी माणसं अनेक मिळतील; पण तुमच्यासारखी मिळणार नाहीत. मी तुमची उणीव कशी भरून काढू? तुम्हीच सांगा."

"आपल्या मुलाचा युक्तिवाद ऐकून खंडोजी तशा स्थितीतही भारावून गेला. काय बोलावे हे त्याला सुचेना. त्याचे म्हणणे बुद्धीला पटत होते. भावनेला पटत नव्हते. आपल्या हाताने आपल्या मुलाचा बळी द्यायचा, ही कल्पना त्याच्या मनात टिकूच शकत नव्हती. या संकटाला कसे तोंड द्यायचे हे त्याला समजत नव्हते. दोघेही धैर्याचे मूर्तिमंत पुतळे होते. एकमेकांवर मात करू पाहत होते. एकमेकांना परावृत्त करीत होते; पण कोणीच आपल्या निश्चयापासून ढळायला तयार नव्हता.

"बाबा, माझा असा हिरमोड करू नका. मोठ्या आशेने मी इथं आलो आहे. पूर्वी तुम्हाला जी संधी मिळाली नव्हती, ती आज मला मिळाली आहे."

"मला न मिळालेली संधी..? कोणती, बाळा.. सांग.."

"तुम्हीच मला सांगितलं होतं, पूर्वी शंभूराजांनी वेडाच्या लहरीत तुमच्या वडिलांना हत्तीच्या पायी द्यायची शिक्षा फर्मावली होती. ते ऐकताच, त्यावेळी तुम्ही सारी बंधनं तोडून आपल्या वडिलांना सोडवायला निघाला होतात. तुमच्या काकांनी तुम्हाला अडवलं तरी त्यांच्या हाताला हिसडा देऊन तुम्ही निघाला होतात."

"खरं, आहे बेटा!"

"पण.. त्या वेळी तुम्ही पुढे जाऊच शकला नाहीत; कारण, तुमच्या वडिलांना हत्तीच्या पायी दिल्याची वार्ता शिपायानं सांगितली आणि तुम्ही खाली कोसळलात. दुर्दैवानं ती संधी तुम्हांला मिळाली नाही. मला आज या संधीचा फायदा घेऊ द्या. बाबा,... बोला... जाता ना येथून...?"

"बेटा, त्या वेळी परिस्थिती वेगळी होती. काळ वेगळा होता. दाद मागायची होती, तक्रार सांगायची होती ती राजाजवळ. मरण आलं असतं तर आपल्या राजाच्या हातून! आजची परिस्थिती वेगळी आहे. भोवताली यवनांचा पहारा आहे. वारंही आत येऊ शकत नाही, तिथं मी इथून कसा जाणार? शत्रूच या ताकदीचा, त्याच्या पहाऱ्याच्या पक्केपणाचा विचार नको का करायला?"

"बाबा, आज मला हे सांगता, पण शंभूराजांना सोडवायला आपण गेला होता. त्यावेळी सारी परिस्थिती अशीच नव्हती का? तरी आपण गेला होता. सारी व्यवस्था करून. तशीच मी आज व्यवस्था केली आहे. आपण निर्विघ्नपणे जाऊ शकाल."

"त्या वेळी शंभूराजे मला तिथं ठेवून परत फिरले नाहीत. त्या वेळी एका महान् समर्पणापुढे मी अयशस्वी ठरलो. माझ्या समर्पणाचे विचार मनातच विरून .."

"बाबा,..."

"बोल.. बेटा.."

"शंभूराजांच्या महान् समर्पणापुढे तुम्ही अयशस्वी झालात.. पण त्यावेळी.."

"बोल.. अडखळलास का?"

"मला वाटतं, त्या वेळी शंभूराजांच्या ऐवजी आपलं

समर्पण झालं असतं तर..?"

"तर इतिहास बदलून गेला असता बेटा! कोणी सांगावं, आजही वेळ आलीही नसती. माझ्या छोट्या समर्पणानं सारं चित्रच बदललं असतं."

खरंच, तुम्हालाही असंच वाटतं. छोट्या समर्पणात एवढी महान् ताकद असते..?"

"अलबत.."

"बाबा,..मग आज तीच वेळ पुन्हा नाही आली? मागे चूक झाली. निदान आता तरी ती चूक पुन्हा करू नका ना! आपण इथून जा. तुमचं काम मी करीन. स्वातंत्र्यासाठी येतील त्या यातना मी धैर्यानं भोगीन;- पण तुम्ही जा.."

"बाळा,खरं म्हणजे तुझ्या आशादायक विचारांनी वठलेल्या झाडालाही कोवळे कोंभ फुटले असते, दगडांनाही चैतन्याचे अंकुर फुटले असते; पण बेटा, तुझा पिता एवढा भाग्यवान नाही. वास्तवाचे चित्र डोळ्यासमोर उभं राहिलं की, हृदयात कालवाकालव होते. तुझ्या बालबुद्धीला वाटतं तेवढं सोपं नाही. मनाचा निश्चय शेवटपर्यंत टिकणं फार कठीण आहे, शत्रूच्या हातात पडल्यावर कसायापेक्षाही निर्घृण मनानं तुझे हाल होतील आणि मग मनातला संकल्प वाऱ्यानं कापूस उडून जातो तसा उडून जाईल. बेटा, तू नीट विचार केला नाहीस."

अजूनही दोघे एकमेकांना समजविण्याचा प्रयत्न करीत होते; पण बहिरवच्या वाक्‌चातुर्यापुढे अन् धैर्यापुढे खंडोजी फिका पडत होता. त्याला काय बोलावे कळत नव्हते. पुत्रप्रेम त्याच्या आड येत होते. वास्तविक स्वातंत्र्यासाठी त्याग करणे ही त्याच्या वंशाची परंपराच होती. बहिरवही खंडोजीच्या

स्वामिनिष्ठेचा, धैर्याचा मूर्तिमंत पुतळा होता. मग तो तरी हार कसा जाणार..? त्याने शेवटी निकरानं सांगितलं,..

"बाबा शरीराला यातना पडल्या म्हणून गनिमापुढे शरणागती पत्करण्याइतका हा आपला मुलगा नामर्द खास नाही आणि मनाचा कमजोरही नाही. बाबा, बंगळूरच्या धर्मशाळेत आपण काय कमी कष्ट सोसलेत? आपण झालात कबूल? केलीत हरामखोरी स्वराज्याशी.. ?"

"नाही... नाही माझ्या राजा.."

"मग बाबा, विश्वास बाळगा. कोणत्याही स्थितीत, काय वाटेल ते झालं तरी मीही माझ्या निश्चयापासून ढळणार नाही. मीही आपलाच मुलगा आहे. इमानदारीच्या आपल्या रक्ताचा थेंबन् थेंब माझ्या शरीरात सळसळत आहे. बाबा, कोणीही विचारलं तरी मी अखेरपर्यंत सांगेन,"मी खंडोजी आहे" —— बाबा..माझ्यावर विश्वास ठेवा आणि इथून लवकर जा. रात्र खूप वाढली आहे त्याचा फायदा घ्या. आता फार वेळ इथं राहण्यात धोका आहे. जा..जा तुम्ही.."

"पोरा, आज तू मला जिंकलंस. तुझ्यासारखी धैर्यवान मुलं या महाराष्ट्राला लाभल्यावर त्याचं स्वातंत्र्य कोण हिरावून घेणार? बाळा..येतो मी.."

खंडोजीने आपल्या पायातल्या बेड्या बहिरवच्या पायात अडकविल्या आणि जड पायाने आणि जड हृदयाने तो वेशांतर करून तेथून बाहेर पडला. बहिरवने स्वतःच्या मनाशीच विचार करत, ती रात्र काढली. त्याच्या चेहऱ्यावर एक लढाई जिंकल्याचे समाधान होते.

सकाळी साऱ्या जगाला जाग आली. थोड्या वेळाने एक शिपाई नाश्ता घेऊन तंबूत आला. त्याने बहिरवला

सांगितले,

"ए,..खा हो..!"

त्याची नजर बहिरवच्या तोंडाकडे जाताच तो चपापला. दोन दिवस पाहिलेला माणूस आणि आजचा माणूस यांत फरक होता. तो धावत - धावतच बाहेर आला. त्याने पहारेकऱ्याला सांगितले. तोही घाबरला. आत येऊन त्याने पाहिले, तो आतमध्ये वेगळाच माणूस! त्याने विचारले,

"क्यूं बे..तुम कौन हो? यहाँ कैसे?'

बहिरवने उत्तर दिले..

"तुम्ही ज्याला पकडलं तोच मी."

"मतलव..?"

"इतना भी नही जानते..मतलब, मेरा नाम खंडोजी."

पहारेकरी गडबडला. काहीतरी घोटाळा दिसतोय. कालची आपली दारू नडली, असे त्याला वाटले. कालपासून कोणीही आत गेल्याचे त्याला आठवेना. नाही म्हणायला, एक फकीर आत गेला आणि बऱ्याच वेळाने तो बाहेर आल्याचे आठवले; पण.. पण तो तर खानाने पाठवले असे सांगत होता. जरा विचार केल्यावर त्याच्या डोक्यात प्रकाश पडला, आपण चूक केली. फकीर, फकीर नव्हता, या काफराने आपल्याला पुरे फसवले हे त्याला कळून आले, मग तो घाबरला आणि तसाच खानाकडे गेला.

बहिरव हे सारे उघड्या डोळ्याने पाहत होता. या सर्व गोष्टींची त्याने तयारी ठेवली होती. आपले हाल होतील, प्रसंगी प्राणही द्यावा लागेल हे त्याला माहीत होते. येईल त्या प्रसंगाला धीराने तोंड द्यायचे असे त्याने ठरवले होते. काल त्याने आपल्या वडिलांना धैर्याचे बोल ऐकवले होते,

आता त्याचे प्रात्यक्षिक करायची वेळ आली होती.

काही काळ लोटला. तंबूची कनात खसकन् बाजूला झाली आणि क्षणातच तारबियतखान पुढे सरसावला. दहा बारा सैनिक त्याच्या पाठीमागे आत घुसले. खानाचा चेहरा संतापाने लालबुंद झाला होता. क्रोधाने तो थरथर कापत होता. तशाच अवस्थेत त्याने दरडावून विचारलं-

"कौन हो तुम? बताओ?"

"आपण कुणाला पकडलं होतं?"

खान चवताळला. जवळच्या सैनिकी अधिकाऱ्याने सांगितले, "सरळ प्रश्नाला अशी तेढी उत्तरं या वयाला शोभत नाहीत."

"शोभण्याचा प्रश्नच नाही. माझं म्हणणं इतकंच की तुम्ही ज्याला पकडलं तोच मी आहे."

"ही मग्रुरी! खानसाहेब स्वत: विचारीत असताना ही उत्तरं! त्यांचा काही मानमरातब?"

"वा..ऽ..म्हणे खानाला मान! कशाकरता? तुरुंगात खितपत पडण्याचं भाग्य दिलं म्हणून? फौजदारसाहेब, खानाचा मान राखायचा तो तुम्ही गुलामांनी. स्वातंत्र्यात वाढलेल्या या सिंहाला शत्रूच्या पुढे गोंडा घोळायची, नाक घासायची सवय नाही आणि स्वातंत्र्याची अशी शिकवणही नाही. समजलात."

बहिरवचे हे खणखणीत उत्तर ऐकून सारे सर्द झाले. खानाच्या मुठी आणखी वळल्या. तो संतापाने अधिकच बेभान झाला. त्याने खंडोजीला पकडल्याचे बादशहाला कळवले होते. आता खंडोजी निसटला. बादशहाला काय सांगणार? या विचाराने तो आणखी खवळला.

"कुत्तेकी औलाद! सिंह क्या है मालूम है? बच्चा देखकर हमने सिधी तरह बात की, तो टेढी जबानसे बात करता है। सिंह देखा भी है कभी?"

"खानसाहेब, सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत राहाणारी आम्ही माणसं. वाघसिंहांशी तर आमची दोस्ती. तुम्हीच नसेल पाहिला सिंह. ख्यालीखुशालीत रहाणारे तुम्ही! आणि पाहिलाच असेल तर तो तसबिरीत."

बहिरवने हसत-हसत उत्तर दिले. परिणाम व्हायचा तोच झाला. खान आणखी भडकला.

"हरामखोर! चूप! हम बेअदब बरदाश्त नहीं कर सकते। बताओ तुम कौन हो?"

बहिरवनें शांतपणे उत्तर दिले. "मी खंडोजी आहे."

"तुम सीधी जबानसे नहीं बताओगे? बताओ..नहीं तो कोडेसे पीटा जाएगा।"

पुन्हा तितक्याच शांतपणे उत्तर आले, "मी खंडोजी आहे." बहिरवने मनाची तयारी केली होती. खानाच्या बोलण्याचा काही उपयोग नव्हता. बहिरवच्या उत्तराने खानाने आज्ञा केली.

"सिपाही! देखते क्या हो..? मारो उस हरामजादे को।"

शिपायांनी मारायला सुरुवात केली. पाठीवर चाबकाचे फटके कडाडू लागले. अंगातून रक्ताच्या चिळकांड्या उडायला लागल्या. बहिरवने एकच उत्तर दिले, "मी खंडोजी आहे." सारे 'आ' वासून पहात होते. खानाने एकामागून एक कठोर शिक्षा फर्मावल्या. भाल्यांची तीक्ष्ण टोके त्याच्या कोवळ्या शरीरात घुसविली. तरीही बहिरवने आपले उत्तर तेच ठेवले. अंगाची साल काढायची शिक्षा सांगितली. अंगाअंगातून रक्त ठिबकू लागले. यातना असह्य होऊ लागल्या. तरीही त्याचं

धैर्य टिकून होतं. खानाला वाटले, आता तरी हा सांगेल; पण छे, त्यानं पुन्हा-पुन्हा तेच उत्तर दिले. शेवटी खान म्हणाला,

"आदमी है या कौन..? मर जाओगे। बताओ, मैं तुम्हे जिंदा छोडूंगा।"

बहिरवने शांतपणाने सांगितले,

"खानसाहेब, मृत्यू तर आमचा मित्र आहे. तुम्ही तरी एवढे कष्ट का घेता, मीच त्याला सामोरा जातो."

काय होत आहे हे कळायच्या आत बहिरवने आपल्या हातातली हिरकणी चावून खाल्ली. वडिलांना, आईला शेवटचा प्रणाम केला. स्वातंत्र्यासाठी, आपल्या स्वराज्यासाठी धैर्याने संकटाला तोंड देत-देत वीरमरण पत्करले. त्याची ज्योत अनंतात विलीन झाली. त्याच्या रक्तातला थेंब अन् थेंब शेवटपर्यंत सांगत राहिला,

"एकदा काम हाती घेतलं, की येणाऱ्या संकटांना
धैर्यानं तोंड द्या. प्रसंगी प्राण गमवावा लागला
तरी हरकत नाही. शरीर नाहीसं होईल,
पण धैर्यवान म्हणून जग तुमची पूजा करील."

❀ ❀ ❀

# दिन कृतार्थतेचा

"सात-आठ दिवसांपूर्वीच मी किती निराश झालो होतो. गुरूचा शोध लागणार नाही, असं निश्चित वाटत होतं. पण तरीही मनाच्या अवकाशात एक पक्षी मधूनच सांगत होता-थांब, थोड थांब. धीर धर. अंतर्यामी धीर धरणाऱ्या माणसाला पुढे आपल्या कर्माची रसाळ आणि गोमटी फळे चाखावयास मिळतात.

हा पक्षी; हा पक्षी होता श्रद्धेचा! श्रद्धा ऽ ऽ! खरंच, किती विलक्षण सामर्थ्य असतं नाही तिच्यात?

श्रद्धा! निराश मनाला आशेचा किरण दाखविते ती श्रद्धा! मृतवत् मनावर चैतन्याची धार धरून त्याला सचेतन करते ती श्रद्धा! बुद्धीनं छिन्न विच्छिन्न केलेल्या स्थानांना नव जीवन देते ती श्रद्धा! दु:खाने गांजलेल्या, पीडेने होरपळलेल्या जीवाला शांतीचा दिलासा देते ती श्रद्धा! आणि दुबळ्या शरीराला महान तपश्चर्या करायला लावते ती श्रद्धा!!

माझ्या श्रद्धेनेच मला तारले होते. एका दिव्य पुरुषाच्या सांगण्यामुळे मी या गावात आलो होतो. इथे असणाऱ्या तुकाराम चैतन्यांना मी गुरू करणार होतो. त्यांचा शोध कसा घ्यायचा याचा मी विचार करीत होतो. तोच जवळच्या लोकांचे त्यांच्याच संबंधीचे बोलणे माझ्या कानावर आले. मी ते लक्ष देऊन ऐकू लागलो.

"अरे, त्या तुकामाईच्याबद्दल काही सांगू नको. तो एक वेडा आहे वेडा! लंगोटी लावून काय हिंडतो? डोक्याला टोपडं काय घालतो? सारे अंग चिखलाने माखलेले असते. याला वेडा म्हणायचे नाही तर काय शहाणा म्हणायचे?"

"वेड्या, माणसाची परीक्षा काय केवळ बाहेरच्या वेशावरून करतात होय? ऊस वाकडा तिकडा आणि बेढब दिसला तरी त्याचा रस गुणीच असतो. बाह्यत: वेड्या दिसणाऱ्या माणसाच्या अंगातही कित्येकदा महान गुण असतात. त्याची योग्यताही मोठी असते."

"छे बुवा, आपला काही विश्वास बसत नाही याच्यावर. आलेल्या लोकांना शिव्या द्यायच्या, काय वाटेल ते प्रश्न विचारायचे हा यांचा मोठेपणा वाटतं? त्यांचे वेड्यासारखे प्रश्न ऐकून समोरचा माणूस पार गांगरून जातो."

"ते प्रश्न एवढे सामान्य नसतात महाराज! त्यात तर सारं तत्त्व सामावलेलं असतं. तुम्हांआम्हांला त्यात काहीच वाटत नाही; पण मोठमोठया लोकांना त्यातलं मर्म समजतं. हिमालयातले काही साधू त्यांच्या दर्शनाला येतात ते काही उगीच नाही."

हे ऐकून तिसरा माणूस म्हणाला

"हे म्हणतात ते खरं आहे. परवाच एक हिमालयातला साधू त्यांच्या दर्शनाला आला होता. आल्याबरोबर त्याने नमस्कार केला आणि तो उभा राहिला. वास्तविक त्याला 'बसा' म्हणायचे पण त्यांनी विचारले, 'स्वत:चा खून करून आलास का?' आम्ही तिथेच होतो पण आम्हाला काहीच कळले नाही, हे असं काय विचारीत आहेत? तोच त्या तपस्व्याने सांगितलं, 'स्वत:चा खून करूनच बाहेर पडलो.' आम्हा साऱ्यांनाच आश्चर्य वाटले. मोठमोठ्या तपस्वी लोकांनाच त्यांची भाषा समजते. मग मात्र, तासभर त्यांची वेदांत, अध्यात्म यावर चर्चा चालली होती. त्यावेळी जर तुम्ही तिथं असता तर तुम्हालाच कळलं असतं की, त्यांच्या इतका

शहाणा माणूस इथं जवळपास तरी कोणी नाही."

हे ऐकताच पहिल्या माणसाने विचारले

"मग हे असं वेड्यासारखे का वागतात? पाहाणाऱ्याला तर पत्ता लागत नाही."

दुसऱ्याने सुरुवात केली,

"मला वाटतं, लोकांनी त्रास देऊ नये म्हणून ते असं वर्तन करीत असावेत."

"कशावरून?"

"आपण त्यांना वेडे म्हणतो, पण अनेकांना त्यांचा अनुभव चांगला आहे. बरेच लोक त्यांच्या सारखे मागे लागतात आणि विचारतात, 'तुकामाई, हे काम जमेल का?' एक ना अनेक प्रश्न विचारून भंडावून सोडतात अगदी. त्यामुळे ते त्रासतात, वैतागतात. या महात्म्यांना भौतिक सुखाचे आकर्षण नसते, पण सामान्य लोकांची मजल तर त्याच्या बाहेर जात नाही ना ! या सामान्य जनतेपासून सारखाच उपद्रव व्हायला नको म्हणून ते वेड्यासारखे वागतात.एकदा लोकांना हा वेडा माणूस आहे हे कळलं की, माणसं आपोआप त्याचा नाद सोडतात. मनात मात्र अगदी आनंदी मूर्ती आहे हं ! कित्येकदा तर दलितांची दुःखं पाहून स्वतःच रडतात. मग सांगतात, 'जा तुझं काम होईल.' खरंच, मोठा माणूस !

रंजल्या गांजल्यांना जो आपलं म्हणतो, त्यांची दुःखं जो हळुवारपणानं हाताळतो आणि त्यांना जो दिलासा देतो तोच खरा महान असतो."

त्यांचे माझ्या गुरुजींच्या बद्दलचे बोलणे ऐकून मी खुदकन् हसलो. एकंदरीत,

माणूस आपल्या अनुभवाचे मापटे हाताशी धरून दुसऱ्या माणसाला मोजीत असतो.

मी उठून त्या लोकांच्या जवळ गेलो. जवळ जाताच त्यांनी माझ्याकडे पाहिले. या गावात मी नवीन आहे, हे ओळखून त्यांनीच बोलायला सुरुवात केली,

"कायरे बाळ, कोठला तू?"

"मी गोंदवल्याचा."

"नाव काय तुझं?"

"गणू म्हणतात मला. रावजी कुलकर्ण्यांचा मुलगा मी."

"अरे, या वयात इतक्या लांब कशाला आलास?"

"मी सत्‌गुरूचा शोध करीत इथं आलो आहे. इथल्या तुकामाईंना मी गुरू करणार आहे."

"पोरा, त्यांचा शिष्य होण्याकरिता आलास, पण फार कठीण काम आहे. ते अत्यंत कठोर परीक्षा पाहातात. उपाशी ठेवतात. शिव्यांचा भडिमार करतात. अपमान करतात. काय वाटेल ते काम सांगतात. त्यांची आज्ञा पालन करून राहाणं म्हणजे एक भयंकर दिव्य आहे, भयंकर दिव्य !"

"मी आपलं मघाचं बोलणं ऐकलं आहे. त्यावरून ते एक महान पुरुष आहेत, असं मला वाटतं. मी त्यांची आज्ञा काटेकोरपणे पाळीन."

माझ्या मनात सहज विचार आला, "यात अवघड काय आहे?"

आरुणी, उपमन्यू यांनी नाही का त्यांच्या गुरूच्या आज्ञा पालन केल्या? त्यांचेही वय माझ्यासारखेच लहान होते. मला त्यांचे आदर्श डोळ्यांसमोर ठेवायला काहीच हरकत

नाही. महान आदर्शामुळे ध्येयमार्गावरील प्रवास सुसह्य होतो.

मी विचारात गढलेला पाहून त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, "काय त्यांच्याबद्दल शंका आली काय? त्यांचे हे असेच आहे. कोणीही त्यांच्याजवळ टिकत नाही."

"मग मी अवश्य प्रयत्न करीन. ज्याच्या करिता मी हजारो मैल पायाखाली तुडविले ते काम पूर्ण केल्याशिवाय मी परत जाणार नाही."

माझा हा निश्चय ऐकताच त्यांना आश्चर्य वाटले. हा पंधरा-सोळा वर्षांचा पोर त्यांच्या हाताखाली कसा टिकेल याची त्यांना शंका आली असावी. मी त्यांना विचारले,

"पण तुकामाय असतात तरी कोठे?"

"काय सांगावं बाबा, शेतात, ओढ्याच्या काठी नाहीतर एखाद्या झाडाखाली कोठेही बसतात ते. दिवस दिवस घरी पण येत नाहीत. वेड्यासारखे कुत्र्याशी किंवा लहान मुलांशी खेळत बसतात."

तुकामाईचा पत्ता मिळाला; पण शोधायला किती अवघड होता. गावातील शेत, ओढ्याचा काठ, सारे शोधायला हवे होते. मी त्या लोकांचा निरोप घेऊन त्यांना शोधण्याकरिता निघालो. घरे मागे पडली. ओढ्याच्या काठाने मी जाऊ लागलो. जाता जाता अनेक लोक मला दिसत होते; पण तुकामाईंचा पत्ता मात्र एकालाही सांगता येत नव्हता. जाताना मन तुकामाईंच्याबद्दल विचार करीत होते. कसे दिसत असतील? कोठे असतील? या विचारापेक्षाही, ते मला जवळ करतील किंवा नाही; मला ज्या गुरूपदेशाची ओढ लागली आहे तो ते मला देतील किंवा नाही; या विचारांनीच मन व्यापले

होते. पावसाळ्यात आकाश मेघांनी गच्च भरून जाते ना त्याप्रमाणे! त्यातून माझे मनच मला मार्ग दाखवीत होते. 'दुसऱ्यांच्या दु;खाने ते रडतात.' हे मघाच्या संभाषणातील वाक्य मला आठवले, आणि मग मला वाटले ते मला निश्चित जवळ करतील. एकदा त्यांनी आपले म्हटल्यानंतर काहीच अडचण नव्हती. कोणत्याही तपश्चर्येची माझी तयारी होतीच. आत्मीयतेने प्रेम निर्माण होते आणि प्रेमाच्या पोटी महान कार्य करण्याचे आणि करवून घेण्याचे सामर्थ्य असते. त्यांच्या शब्दाकरिता उपाशी राहण्याची, वाटेल ते कष्ट वाटेल तेव्हा करण्याची, त्यांची आज्ञा काटेकोरपणे पालन करण्याची, प्रसंगी प्राण देण्याचीही माझी तयारी होती. या गोष्टी मी आनंदाने करणार होतो. त्यातूनही एखादे वेळी कंटाळा आला, मनात नसले तरी मला त्या गोष्टी करणे भागच होते.

विचारांच्या तंद्रीत मी गावाजवळचा सारा परिसर धुंडाळला. पण तुकामाईंचे दर्शन झाले नाही. शेवटी मी गावात आलो. लोकांना विचारून त्यांचे घर शोधून काढले. तेथेच जाऊन बसलो. निवांत बसल्यावर मला तहान, भूक याची जाणीव झाली. अनोळखी गावात काही मिळेल याची आशाच नव्हती.मी रामनामाचा जप करू लागलो. तोच मला आसरा होता. तोच मला आधार होता. आवडत्या गोष्टी करीत असताना देहधर्मांचे विस्मरण होते. माझे मन रामनामात रंगून गेले.

कुणाच्या तरी धावत येण्याच्या आवाजाने आणि आरडा ओरडण्याने मी भानावर आलो. आधी एक माणूस आरडा-ओरडा करीत घरात शिरला. डोक्याला टोपडे घातलेला व कमरेला लंगोट लावलेला. एका हातात होती चिलीम आणि दुसऱ्या हातात होते उसाचे दांडके. त्यानंतर त्यांच्या बरोबरची दोन

तीन माणसे आत शिरली. प्रथम आत गेलेल्या माणसाला, मघाशी ऐकलेल्या वर्णनावरून, मी ओळखले. हीच गुरुमूर्ती! हेच माझे अंतिम ठिकाण! इथे ज्ञानामृत मिळणार. हे विचार मनात येतात तोच आतील संवाद ऐकू आला.

" तुम्हांला पंधरा-सोळा वर्षांचा एक मुलगा केव्हाचा शोधत आहे. रामनामाचा जप करीत दरवाज्याजवळच बसला आहे."

तोच रागावलेला आवाज आला-

"कोण पोरगा? कोठला? कोठे आहे तो?"

शब्द कानावर पडताच मी भानावर आलो. त्यांच्याबद्दलची सारी महिती डोळ्यांसमोर उभी राहिली. कोणत्याही बाबतीत माघार घ्यायची नाही, मागे सरायचे नाही अशी प्रतिज्ञा करीतच मी आत गेलो. आत जाताच त्यांची माझी दृष्टादृष्ट झाली. ते परत माझ्या अंगावर ओरडले-

"कोण? हा पोरगा?"

मी मानेनेच होकार दिला. ते पाहताच जवळचा ऊस हातात घेऊन ते म्हणाले,

"थांब! खून करतो तुझा."

अगदी निमिषभर मी मागे सरकलो. पण लगेच मी माझ्या शरीराला त्यांच्या पायावर झोकून देत म्हटले-

"मीही आपल्या पायावर जीव देतो."

या संपूर्ण समर्पणाने कदाचित त्यांना आनंद वाटला असावा. त्यांनी मला एकदम जवळ ओढले. माझ्या पाठीवरून प्रेमाने हात फिरविला. माझी विचारपूस केली. मला सांगितले "इथं राहा. मी सांगेन तसं ऐकायचं. माझ्या मनाविरुद्ध

वर्तन झाले तर ठार मारीन. समजलं?"

मी होकार दिला. थोड्याच वेळात तुकामाई पुन्हा कोठेतरी निघून गेले.

मी सारी व्यवस्था समजावून घेतली आणि माझा दैनिक कार्यक्रम ठरवून टाकला. गुरूचे आज्ञापालन हेच माझ्या ध्यानीमनी होते. स्वप्नातही मला तेच दिसत होते. हरएक उपायाने तुकामाईंचे मन प्रसन्न राखणे एवढेच माझ्यापुढे ध्येय होते. मी ते करणार होतो. त्याकरिता माझा उपाय होता आज्ञापालन! मला सहज वाटले, आज्ञापालन म्हणजे यशोमंदिराकडे घेऊन जाणारा रस्ता. ध्येयमार्गाच्या यशस्वी वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा. दुसऱ्याच्या अंत:करणात जवळीक निर्माण करून आज्ञाधारकाला आपल्या जवळील सर्वस्वाचे दान करायला सांगणारी महान शक्ती!

त्या दिवसापासूनच मी माझ्या व्रताला सुरुवात केली. रात्री जेवण झाल्यानंतर गुरू झोपले. मी त्यांचे पाय चेपीत बसलो होतो. बरीच रात्र झाली. ते झोपेच्या आधीन झाल्यावर मीही तेथून उठलो आणि झोपी गेलो.

ते सांगतील त्या गोष्टी मी ऐकत होतो. कधी ते प्रेमाने सांगत तर कधी रागावत. सकाळी त्यांच्या आधी उठावे लागे. ते बाहेर पडले की मलाही बाहेर पडावे लागे. त्यांच्या पाठोपाठ सावलीसारखे फिरावे लागे. ते कधी संथपणे चालत तर कधी पळत सुटत. मलाही त्यांच्या सारखे करावे लागे. बरं, तेवढ्यावरतीच भागेल असं नाही. बाहेर जाताना मला बरोबर यायला सांगत आणि थोडे अंतर चालून गेल्यावर मला मधेच म्हणत-'गण्या, लेका, माझ्या मागे मागे का येतो आहेस? मी काय पळून चाललो आहे काय?" मग मी म्हणावे-"गुरुदेव, आपली आज्ञा होती म्हणून मी आलो."

"हं, जास्त बोलू नकोस. चल पुढे." असे कितीदा तरी घडत असे. स्वस्थ बसलेले तर स्वारीला कधीच आवडायचे नाही. लगेच अंगावर खेकसतील-"गण्या, काम कोण तुझा काका करणार आहे? स्वस्थ बसला आहेस गणपतीसारखा!

दिवसभराच्या कामाने आणि श्रमाने रात्री झोप यायची. अशा स्थितीतही केवळ गुरूची आज्ञा म्हणून मी त्यांचे पाय चेपत असे. त्यांना झोप लागली असे ते दाखवायचे आणि मी बाजूला सरकलो की ओरडायचे, "माझे पाय चेपण्याचे निमित्त केले आणि जरा कोठे डोळा लागतो तोच गेला की झोपायला! अशीच आज्ञा पालन करणार का? जा चालता हो. क्षणभर देखील इथे राहू नकोस." अशी गुरूंची वाक्ये ऐकली की मी झोपेला दूर सारीत असे आणि पुन्हा पाय चेपत बसत असे.

तेथल्या ग्रामस्थांनी पहिल्या दिवशी सांगितल्याप्रमाणे खरोखरच तुकामाईंची आज्ञापालन म्हणजे तारेवरची कसरत होती. अत्यंत कठीण काम होते. असे अनेक प्रसंग घडले की, सारे सोडून निघून जावे असे वाटत होते. पण मनाला आवर घातल्यावाचून गत्यंतर नव्हते. एवढ्या क्षुल्लक परीक्षांनाच जर मी उतरलो नसतो तर मला उपदेश कसा मिळाला असता?

तेथल्या वास्तव्यात पुढे आलेले दोन-तीन अनुभव तर फारच कठीण होते. त्यातून मी कसा पार पडलो, हे त्या श्रीरामालाच माहीत. केवळ त्याचीच कृपा. माणसाने कितीही प्रयत्न केले तरी परमेश्वरी कृपेशिवाय यश मिळत नाही हेच खरे. याचा अर्थ प्रयत्नाचे महत्त्व कमी आहे असे नाही; पण प्रयत्नाला परमेश्वरी कृपेची जोड ही असावीच

लागते.

दिवसामागून दिवस जात होते. चैत्र महिना होता. शुद्धाष्टमीचा दिवस. तुकामाईंनी मला आज्ञा केली-

"गणू, माझ्याबरोबर चल." "कोठे" हे विचारायची सोय नव्हतीच. मी निमूटपणे त्यांच्या मागोमाग चालू लागलो. सकाळच्या प्रसन्न वातावरणाने आणि वाऱ्याच्या झुळकेने चालण्याचे श्रम वाटत नव्हते. मनही आनंदी होते. बऱ्याच वेळाने एका शेतात वडाच्या झाडाखाली ते थांबले. मला जवळ उभे राहण्यास सांगितले. बराच वेळ ते अबोल होते. कोणत्या विचारात दंग होते कोणास ठाऊक.

कधी आकाशाकडे पाहात तर कधी झाडाच्या पानांच्याकडे पाहात. मधेच त्यांना कसली तरी लहर आली आणि त्याच तंद्रीत ते म्हणाले-

"गणू, इकडे ये."

मी त्यांच्याकडे जाताच त्यांनी आज्ञा केली.

"ह्या वडाची पानं तोड पाहू. मला हवी आहेत."

मी काही पाने तोडून त्यांच्यापुढे ठेवली. ती पाहून त्यांना आनंद व्हायला पाहिजे होता. पण ते त्रासलेले दिसले. एकदम ओरडून ते म्हणाले-

"गण्या, पानं कशाला तोडलीस? तुला काही अक्कल आहे का?"

"पण......, आपली आज्ञा गुरुदेव......"

"तुझा हात तोडला तर तुला दुःख होईल की नाही?"

"होय गुरुदेव."

"मग त्या झाडाला नाही का पानं तोडल्यामुळे दु:ख होत. बघ तेथून दूध गळत आहे. जणू ते झाड अश्रू ढाळीत आहे."

"क्षमा असावी. यावर काही उपाय आहे का ?"

"उपाय ? ...जा ती पानं परत तेथेच चिकटवून टाक. उठ !" या त्यांच्या आज्ञेने मी चांगलाच हदरलो. 'हो' म्हणावे तरी कसे ? कारण एकदा तोडलेली पाने पुन्हा कशी चिकटविणार ? आणि नाही म्हणावे तर अवकृपा आणि आज्ञाभंग! दुहेरी पेच होता. क्षणात मी स्वत:ला सावरलं आणि बोलायला सुरुवात केली—

"गुरुदेव..."

"काय ?"

"आपण पानं परत चिकटविण्यास सांगितली पण..."

"पण काय ?"

"अशी पानं चिकटविता येतात असं मी कोठेहीं पाहिलं नाही आणि ऐकलंही नाही. तेव्हा..."

तेव्हा काय ?"

काही वेळ ते गप्प बसले आणि मग म्हणाले—

"ठीक आहे. फेकून दे ती पाने आणि चल माझ्याबरोबर."

मी त्यांच्या पाठोपाठ चालू लागलो. आज ते माझ्याशी अगदी मोजकेच बोलत होते. विचारात सारखे गढून गेल्यासारखे वाटत होते. त्यामुळेच त्यांचे मन सांभाळणे मोठे कठीण काम झाले होते. अजून त्यांनी माझ्यावर अनुग्रह केला नव्हता. तरीही त्यांच्या कृतीतून मला जीवनाचे तत्त्वज्ञान थोडे थोडे समजू लागले होते. ते कोणत्याही परिस्थितीत मनाने समतोल

राहात असत. हर्ष-खेदादी भावना त्यांच्या मनाचा तोल ढासविण्यास असमर्थ होत्या. त्यांचे जीवन मला एखाद्या स्थिर ज्योतीप्रमाणे वाटत होते. तसे जीवन जगता येणे कठीण होते. मला वाटलं माणसाला तत्त्वज्ञानाचे जीवन जगता आले नाही; तरी जीवनाचे तत्त्वज्ञान समजावून घ्यायला काहीच हरकत नाही.

जाता जाता गुरूंची लहर काय लागली कोण जाणे ते समोरच्या उसाच्या शेतात शिरले. त्यांना पाहाताच शेतकऱ्याने त्यांचे स्वागत केले. आपली पूर्व-पुण्याई उदयाला आली असे त्याला वाटले. उसाचा रस पुढे करीत तो म्हणाला-

"महाराज, ही गरिबाची सेवा..."

ताडकन ते उत्तरले, "मी काय रस प्यायला इथे आलो आहे काय? गण्या, तो रस घे आणि टाक पिऊन!"

मला मोठे कोडे पडले. गुरूंनी रस घेतलेला नाही, मी अशा स्थितीत रस प्यालो तर तो त्यांचा अपमान होईल, याकरिता त्यांना न कळेल अशा बेताने शेतकऱ्याची समजूत मी घातली आणि रस परत न्यायला सांगितला. तरीही तो परत जात असताना त्यांनी पाहिलेच पण ते काहीही बोलले नाहीत. शेतकरी परत येताच ते म्हणाले,

"तुझी इच्छाच आहे तर दे पाच-पंचवीस ऊस. हा गणू नेईल घरी."

शेतकऱ्याने उसाची मोळी बांधून आणली. चांगले दोन माणसांचे ओझे होते, एवढे होईपर्यंत दुपारचे बारा वाजत आले होते. सकाळपासूनच्या हिंडण्याने पोटात कावळे कोकत होते. घरी कधी पोहोचू आणि खायला कधी मिळेल याची शाश्वती नव्हती. तोच गुरुदेव उठले आणि त्यांनी मला

सांगितले— "गणू, उचल ते उस आणि चल घरी."

माझ्या डोळ्यांपुढे तर काजवेच चमकायला लागले. श्रीरामाचे नाव घेऊन मोळी उचलली. श्रीरामावर माझी निष्ठा होती. सारे तोच घडवीत होता. कित्येकदा निष्ठेनेही महान कार्ये करण्याची शक्ती प्राप्त होते.

थोडा वेळ ते नीट चालले पण पुढे गेल्यावर ते मधून मधून पळायला लागले. त्यांच्याबरोबर पळणे अशक्य होऊ लागले. माझा तोल जाऊ लागला. पायात काटे मोडत होते. ते काढण्याकरिता खाली वाकणे शक्य नव्हते. दम लागला होता. पण उपाय नव्हता, मनातल्या मनात मी देवाचा धावा करीत होतो.

"देवा, आता तूच माझी लाज राख."

थोड्या वेळाने एक नदी आली. तेथून गाव जवळच होते. मला जरा हायसे वाटले. तेवढ्यात तुकामाई म्हणाले-"गणू, टाक ती मोळी इथे." मी मोळी खाली टाकली. किती हलके वाटले मला! तोच त्यांनी सांगितले, "गणू, मी स्नान करतो. तू बस इथे. पाणी वगैरे प्यायचे असेल तर पिऊन घे."

गुरूजी स्नानाकरिता गेले. मी हात पाय धुतले. पाणी प्यायलो. तेवढेच बरे वाटले मला. खरं म्हणजे भूक लागली होती; ती पाण्यावर भागविली. थोड्या वेळाने गुरुजी आंघोळ करून आले. मला म्हणाले,

"पाणी किती थंड आहे. उन्हातून आल्यामुळे तर अधिकच बरे वाटते. तूही अंघोळ कर. मी काठाशी थांबतो."

जाणारे येणारे आमचा संवाद ऐकत होते; पण त्याची

दखल घेण्याचे आम्हाला काहीच कारण नव्हते. मी थोडा वेळ पाण्यात डुंबतो न डुंबतो तोच गुरुजींचे शब्द मला ऐकायला आले, "गणू, या पाण्यात बुडी मार. मी सांगितल्याशिवाय पाण्याबाहेर यायचे नाही. बाहेर आलास तर याद राख!" मी पाण्यात बुडी मारली. एक क्षण गेला. दुसरा गेला. बराच वेळ गेला. शेवटी तासाने ते काठावरून ओरडले-

"गण्या, लेका वर ये. आला नाहीस तर मी पण नदीत उडी टाकून तुला भेटायला येतो."

मी पटकन वरती आलो. इथे येण्यापूर्वी मी साऱ्या भारताची यात्रा केली होती. अनेक संतसज्जनांच्या गाठीभेटी घेतल्या होत्या. त्यांनी मला अनेक विद्या शिकविल्या होत्या. अबूच्या पहाडावर असताना तेथील महंतांनी मला योगविद्या शिकविली होती. त्याचा उपयोग मला या क्षणी झाला. क्षणाक्षणाने विद्या मिळवीत असावे. कोणत्या विद्येचा कोणत्या ठिकाणी उपयोग होईल, हे सांगता येणार नाही.

मी काठाशी आलो तर काठाजवळ शे-दीडशे माणसे उभी होती. काहीतर नदीत उड्या मारण्याच्या विचारात होती. तुकामाईंच्या डोळ्यांतून आसवे झरत होती. माझ्याकरिता रडताना मी त्यांना प्रथमच पाहत होतो. त्या अश्रूंनी मला समाधान वाटले. मी काठावर येताच त्यांनी मला प्रेमाने कवटाळले. प्रेमाने पाठीवर हात फिरविला. त्या स्पर्शात दुःख नाहीसे करण्याचे सामर्थ्य होते. आनंदाने ते म्हणाले.

"माझा बाळ तो!" त्यांच्या अश्रूंचा अभिषेक माझ्या मस्तकावर सरू झाला. त्यात मी न्हाऊन निघालो आणि माझे मनही!

हा सारा प्रकार आहे तरी काय? माझ्या लक्षात काही येईना. मला नदीत उडी मारायला सांगितली होती व 'सांगितल्यावर वर ये' अशी आज्ञा होती. मग ही एवढी माणसे कशाकरिता जमा झाली हे मला समजेना. थोड्या वेळाने त्यांनी मला कपडे बदलायला सांगितले व ते बसले. मी जरा दूर जाताच एकदोन माणसांनी माझ्याजवळ येऊन विचारले.

"काय रे नदीत मरायचा विचार होता काय?"

मी आणखीनच भांबावलो. मग त्यांना माझ्या गुरूंची आज्ञा सांगितली व आज्ञापालनाकरिता मी बाहेर आलो नाही असे सांगितले. हे ऐकताच लोकांच्या चेहऱ्यावर आश्चर्य व आनंद यांच्या संमिश्र भावना तरळत होत्या. मग मी 'हा सारा प्रकार काय आहे?' हे विचारले. त्यातील एकजण म्हणाला,

"तू बुडी मारल्यानंतर तुकामाईंनी आरडाओरडा करायला सुरुवात केली." "माझा बाळ बुडाला. कोणाचा होता कोण जाणे. आता मला पाप लागेल. कोणी तरी त्याला वाचवा हो वाचवाऽऽ!"

एक दोघांनी ते शब्द ऐकले. तुकामाईंचे शब्द! भराभर गावातले लोक आले. काही जण तर तुला शोधण्याकरिता आत्ता उड्याच घेणार होते; पण तेवढ्यात तुकामाईंनी "लवकर बाहेर ये. नाहीतर मी तुला भेटायला येतो." असे सांगताच तू वरती आलास."

थोड्या वेळात लोक घरी गेले. एका माणसाला तुकामाईंनी ती ऊसाची मोळी घरी न्यायला सांगितली. आम्ही घरी आलो. मला त्यांनी जवळ बसविले. दुसऱ्या शिष्यांना सांगितलं, "आज आम्ही एकदम जेवणार आहोत. गणू आज काही

काम करणार नाही.'' आमचे जेवण झाले. दुपार टळून गेली होती.

त्या रात्री त्यांनी मला जवळ बोलवून सांगितले,

''बाळ! तुला म्हणजे मी अगदी कसाई वाटत असेल पण शिष्याला गुरूपदेश करण्यापूर्वी तो त्या उपदेशास पात्र आहे किंवा नाही याची कठोर परीक्षा घ्यावी लागते. थोर लोकांनी सांगितले आहे की, सत्पात्री दान करावे. विद्यादानाच्या बाबतीतही ते पाहावेच लागते. विद्या योग्य माणसाच्या हाती आली तरच तिचा चांगला उपयोग होतो. चांगल्या जमिनीत बी टाकले म्हणजे जसे चांगले धान्य येते, तसेच विद्येचेही आहे.

मी आजपर्यंत तुझी कठोर परीक्षा पाहिली. पहिल्या प्रथमच मी तुला सांगितले की, 'मी तुझा खून करतो' मला वाटलं होतं तू भिऊन पळून जाशील; पण तू दिलेल्या उत्तराने, तुझ्या समर्पणाने मला आनंद वाटला होता. नंतर मी तुला अनेक कामे सांगितली. हलकीसलकी कामे सांगितली. तरीही ती तू केलीस. यात हेतू हाच होता की तुला कोणत्याही प्रकारचा देहाभिमान राहू नये. तुझा 'मी' पणा निघून जावा. आता तुझा देहभिमान नष्ट झाला आहे. या साऱ्या बाबतीत मी बारकाईने परीक्षा घेत होतो. आज तर मी तुझी शेवटची आणि कठोर परीक्षा घेण्याचे ठरविले होते. वडाच्या झाडाची पाने तुला चिकटवायला सांगितली. ती पानं परत झाडाला चिकटविता येणार नाहीत, हे मला माहीत होते; पण तू सांगकाम्या नाहीस ना? आपली मतं तू ठामपणे गुरुजींच्या पुढे मांडतोस किंवा नाही हे मी पाहिले. कारण, अती भीरू माणसाला कोणतीच विद्या प्राप्त होत नसते.

शेतात गेल्यावर मी उसाचा रस प्यालो नाही. तुला पिण्यास सांगितले. तू तो प्यायला नाहीस. खरं म्हणजे आज्ञाभंग केलास. पण पोरा, तेच योग्य होतं. गुरूच्या अयोग्य आज्ञा पाळावयाच्या नसतात, तशा प्रकारच्या आज्ञा देण्यात शिष्याची परीक्षा बघण्याचा हेतू असतो. मला त्या ठिकाणी तुझी नम्रताच दिसली. हाच विनय, हीच नम्रता विद्याप्राप्तीनंतरही ठेव. विद्या विनयानेच शोभून दिसते. ज्याप्रमाणे फळभाराने डवरलेले वृक्ष अंगी नम्रता धारण करतात, त्याप्रमाणे विद्या-संपन्न माणसाने नेहमी नम्रताच धारण करावी.

मग मी तुला उसाची मोळी घरी नेण्यास सांगितलं. यात कितीही अवघड काम तू न कुरकुरता करतोस किंवा नाही हे मी पाहिलं. नदीत बुडी मारायला सांगितली आणि तासभर वरती बोलावलेच नाही. सारंच नाटक केलं. जीव जाण्याचा प्रसंग होता तो! माझ्यावर तुझी नितांत निष्ठा आहे किंवा नाही याची ती अखेरची चाचणी होती. या सगळ्या कसोटयांतून तू पूर्ण यशस्वी झाला आहेस. आता शांतपणे झोप. उद्या रामनवमी आहे. दिवस चांगला आहे. उद्या मी तुला गुरूपदेश देईन. आता निश्चिंत राहा.''

आज रामनवमीचा दिवस! रामजन्माचा दिवस! रामराज्याच्या सुखद कल्पनांची आठवण देणारा दिवस! आनंदाचा दिवस! भाग्याचा दिवस! काय वर्णन करू त्या दिवसाचं? माझ्या जीवनातला तर अमृत योग! संपूर्ण जीवन चैतन्यमय करण्याचा योग! कृतार्थतेचा दिवस!!

सकाळी दहा-अकरा वाजण्याच्या सुमारास आम्ही दोघेही रानात गेलो. स्नान केले. अशोक वृक्षाखाली बसलो. तुकामाईंनी माझ्या डोक्यावर हात ठेवला. माझी समाधी लागली. थोड्या

वेळाने समाधी उतरल्यावर ते अमृतवाणीने म्हणाले,

''आता तुझं नाव ब्रह्मचैतन्य! 'श्रीराम जयराम जय जयराम' या त्रयोदशाक्षरी नामाचा जप कर. रामोपासना कर. या क्षणापासून तुला रामदासी दीक्षा दिली आहे. रामनामाचा प्रचार कर. त्याचं महत्त्व वाढव. दीन-दलितांची सेवा कर. खरा देव तेथेच आहे. लोकात भजनाचे महत्त्व वाढव. सामान्य लोकांना संसारात राहून परमार्थ कसा करायचा ते शिकव. कशाचाही मोह न ठेवता सगळीकडे प्रेम वाढीला लागेल असा प्रयत्न कर.''

मी तुकामाईंच्या पायावर डोके ठेवले. अश्रूंनी त्यांचे पाय भिजवले. माझे जीवन धन्य झाले होते. कृतार्थ झाले होते. मी वर पाहिलं. सूर्य बरोबर डोक्यावर आला होता. रामजन्म झाला होता.

❀ ❀ ❀

3008

BVBK-0403004